
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २४४
www.ramprahar.com
◆ सोमवार, २३ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
घेरावाडी ग्रामस्थांची पाणी समस्या मार्गी/३
माणगावमध्ये जलवाहिनीला गळती; पाणी वाया/५
नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धा/८

## हर्षवर्धन सदगीर बनला सातवा ‘डबल महाराष्ट्र केसरी’



**पुणे** : वाघोली येथे झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अंतिम सामना महेंद्र गायकवाड (नाशिक) आणि हर्षवर्धन सदगीर (सोलापूर) यांच्यात झाला. यामध्ये हर्षवर्धनने महेंद्रला ४-२ असे पराभूत करीत मानाचा महाराष्ट्र केसरी किताब जिंकला. या विजयासह हर्षवर्धन हा सातवा डबल महाराष्ट्र केसरी झाला आहे. तत्पूर्वी महेंद्रने माती विभागातील अंतिम फेरीत सिकंदर शेखचा (हिंगोली) पराभव केला, तर हर्षवर्धनने जय पाटीलला (सोलापूर) गादी विभागातील अंतिम फेरीत पराभूत केले होते. अंतिम लढतीत पहिला हाफ संपेपर्यंत १-१ असा सामना बरोबरीत होता. दुसऱ्या हाफमध्ये हर्षवर्धनने ४-१ अशी आघाडी मिळवली. यानंतर हर्षवर्धन बाहेर गेल्याने एक गुण महेंद्रला मिळाला. कुस्तीची वेळ संपली तेव्हा हर्षवर्धनने ४-२ असा विजय मिळवला.

# पंतप्रधान मोदींचा ऐतिहासिक विक्रम

## सर्वाधिक काळ प्रमुखपद भूषवणारे ठरले पहिले नेते

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारचे नेतृत्व करत सार्वजनिक पदावर दीर्घकाळ काम करण्याचा नवा विक्रम रविवारी (दि. २२) केला. त्यांनी सलग ८९३१ दिवस सार्वजनिक पदावर राहून सरकारचे नेतृत्व केले आहे. याआधी सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांनी ८९३० सार्वजनिक पदावर राहून सरकारचे नेतृत्व करण्याचा विक्रम केला होता.



गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे पंतप्रधान असा दोन्ही कार्यकाळ मिळून नरेंद्र मोदींनी हा टप्पा गाठला असून आता त्यांनी सत्ताप्रमुख म्हणून आपल्या २५व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून ७ ऑक्टोबर २००१ रोजी पहिल्यांदा पदभार हाती घेतला आणि मे २०१४पर्यंत मुख्यमंत्री म्हणून काम केले. नंतर २६ मे २०१४ रोजी त्यांनी देशाचे १४वे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला, तेव्हापासून ते देशाचे नेतृत्व करत आहेत. म्हणजेच त्यांनी ७ ऑक्टोबर २००१पासून आतापर्यंत ८९३१ दिवस सार्वजनिक पदावर राहून सरकारचे नेतृत्व केले आणि करत आहेत.

मागील काही वर्षांत पंतप्रधान मोदींनी अनेक राजकीय मापदंड प्रस्थापित केले आहेत. ते गुजरातचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले आहेत आणि राज्याचे नेतृत्व करण्याचा सर्वाधिक व्यापक अनुभव असलेले पंतप्रधान आहेत.

पंतप्रधान मोदींचा कार्यकाळ सततच्या निवडणुकीतील यशाने गाजला आहे. त्यांनी भारतीय जनता पक्षाला २०१४, २०१९ आणि २०२४च्या सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवून दिला आणि दोन पूर्ण कार्यकाळ पूर्ण करून तिसऱ्यांदा परतणारे ते पहिले बिगर-काँग्रेसी पंतप्रधान आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे यूट्यूबवर ३० दशलक्ष सबस्क्रायबर आहेत. यूट्युबवर सर्वाधिक सबस्क्रायबर असलेल्या राजकीय नेत्यांमध्ये ते जगात अव्वलस्थानी आहे. पंतप्रधान मोदींचे इन्स्टाग्रामवर आणि एक्स (पूर्वीचे ट्विटर)वरील फॉलोअर १० कोटींपेक्षा जास्त आहेत. लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपले जागतिक स्थान अधिक भक्कम केले आहे.

# खरात प्रकरण गंभीर, आम्हीच त्याचा भांडाफोड केला -मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरात याचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. इंटेलिजन्सच्या सहाय्याने आम्हीच त्याचा भांडाफोड केला. या प्रकरणात कोणालाही वाचवले जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. ते रविवारी (दि. २२) नागपूर येथे पत्रकारांशी बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर मॉनिटरिंग होत आहे. राज्याच्या पोलीस महासंचालकांनाही (डीजी) विशेष सूचना देण्यात आल्या असून नाशिक पोलीस आणि एसआयटी यांच्या माध्यमातून सखोल तपास सुरू आहे. तपासात कोणतीही तडजोड केली जाणार नसून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

या प्रकरणात आणखी काही महिला पुढे आल्याने नवे वळण मिळाले आहे. अनेक महिला सामाजिक दबाव, भीती आणि बदनामीच्या कारणामुळे आतापर्यंत पुढे येत नव्हत्या, मात्र आता त्यांना धीर देऊन पुढे आणण्याचे प्रयत्न सुरू असून काही प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. महिलांना न्याय मिळवून देणे हेच सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



विरोधकांनी काही मंत्री खरातला भेटल्याचा आरोप केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी त्यावर प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, हवेत बोलण्याला काही अर्थ नाही. ज्यांच्याकडे ठोस पुरावे आहेत त्यांनी ते पुढे आणावेत. सरकार नक्कीच कारवाई करेल, मात्र विरोधकांनी या प्रकरणावर राजकारण करू नये. विरोधी पक्षाचे कोण कोण खरातकडे गेले त्यांचे मी पुरावे देऊ शकतो. सर्वात जास्त तर माझ्याकडे पुरावे आहेत, पण ते पोलिसांकडे आहेत. हे पोलिसांचे काम आहे, माझे नाही.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा महिलांच्या सन्मानाचा आहे. अशा प्रकारे आपल्या तथाकथित शक्तींचा उपयोग करून महिलांना भरीस पाडणे यापेक्षा वाईट गुन्हा असू शकत नाही. काही झाले तरी त्यांना त्याची शिक्षा ही भोगावीच लागेल. सरकार आणि पोलीस याकरिता जे करावे लागेल ते करायला तयार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### राजकारण करणाऱ्या विरोधकांना सुनावले

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोघम आरोप करणाऱ्या विरोधकांवर हल्लाबोल केला. अशोक खरात यांच्यासोबत काही नेत्यांचे फोटो समोर आल्याने विरोधकांकडून राजीनाम्यांची मागणी होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री म्हणाले, फोटोवरून कोणताही निष्कर्ष काढता येत नाही. ठोस पुरावे आवश्यक आहेत. कोणीही कोणासोबत फोटो काढू शकतो, मात्र ज्यांनी मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावून ४० किलोमीटर दूरवरून पाणी दिले त्यांना काय शिक्षा द्यायची? असा सवाल त्यांनी उपस्थित केला तसेच मंत्र्यांबद्दल बोलणारे काही जण इतर प्रकरणांवर गप्प का आहेत? सिलेक्टिव्ह बोलणे थांबवायला हवे. सरकारला या प्रकरणात राजकारण करण्याची अजिबात इच्छा नाही. आमचा इंटरेस्ट राजकारणात नाही, तर महिलांच्या सन्मानात आहे, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना सुनावले.

## मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटीतून पैसे चोरले

### कर्मचाऱ्याला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिर येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंदिरातील एका कर्मचाऱ्याला दानपेटीतून पैसे चोरल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, यापूर्वीही त्याने अनेकवेळा पैसे चोरल्याचा संशय पोलिसांना असून त्या दृष्टीने तपास करण्यात येत आहे.



राजेंद्र पेंडुरकर (वय ५७) असे या आरोपीचे नाव असून तो लोअर परळ परिसरातील रहिवासी आहे. तक्रारदार हे शुक्रवारी सीसीटीव्ही फुटेज तपासत असताना पेंडुरकर दानपेटीतून पैसे चोरताना दिसला. यानंतर तक्रारदार यांनी याची माहिती तत्काळ वरिष्ठांना दिली. मग मंदिर ट्रस्टने मागील ८ ते १० दिवसांचे फुटेज तपासले असता आरोपी वारंवार दानपेटीतून पैसे चोरत असल्याचे समोर आले. त्यानंतर ट्रस्टने दादर पोलिसांशी संपर्क साधून अधिकृत तक्रार नोंदवली.

पोलीस तपासादरम्यान आरोपीने १० हजार रुपये चोरल्याचे कबूल केले आहे, मात्र वारंवार चोरी केल्याच्या संशयामुळे एकूण रक्कम अधिक असण्याची शक्यता आहे तसेच या प्रकरणात आणखी काही कर्मचारी सामिल असण्याचा संशय पोलिसांना असून अधिक तपास सुरू आहे.

## नवी मुंबईत १४ वर्षीय मुलाने केली आत्महत्या

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील घणसोली येथे राहणाऱ्या एका १४ वर्षीय मुलाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. प्रीत रानकर असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे.

प्रीत हा पालकांसह घणसोली गावातील रानकर आळीत राहत होता. शुक्रवारी संध्याकाळी घरात कोणी नसताना खिडकीला पडदा लावण्याच्या रॉडला टॉवेलच्या सहाय्याने त्याने गळफास घेत आत्महत्या केली. पालक जेव्हा बाहेरून घरी आले त्यावेळी ही बाब लक्षात आली. या घटनेची नोंद रबाळे पोलिसांनी घेतली असून प्रीतने एवढे टोकाचे पाऊल का उचलले याचा तपास केला जात आहे.

## निवडक

### ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दत्ता मेघे यांचे निधन



**नागपूर** : विदर्भातील ज्येष्ठ राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक तथा राज्याचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचे रविवारी (दि.२२) नागपूर येथे निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांनी चार वेळा लोकसभा खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले. याशिवाय राज्यसभा सदस्य तसेच महाराष्ट्र विधान परिषदेतही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती. त्यांच्या निधनाने विदर्भासह राज्याच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे.

### भोंदूबाबा अशोक खरातचा आणखी एक कारनामा उघड

**नाशिक** : महिलांवरील अत्याचारप्रकरणी पोलीस कोठडीत असणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात याची धक्कादायक प्रकरणे आता एकापाठोपाठ एक समोर येऊ लागली आहेत. गरोदरपणात करावयाच्या पूजाविधीचे कारण देत खरातने एका महिलेवर अत्याचार केला तसेच याबाबत कुठेही वाच्यता केल्यास पतीसह कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे.

## कर्जत रेल्वेस्थानकात गुटखा, पान मसाला जप्त

### दोघे अटकेत, दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**कर्जत : प्रतिनिधी**

रेल्वे सुरक्षा दलाने कर्जत स्थानकात अवैध गुटखा आणि पान मसाला वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून सुमारे दोन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक २२९४४ डाउन इंदौर-दौंड एक्सप्रेस शनिवारी कर्जत रेल्वेस्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर दाखल झाली. या गाडीची नियमित तपासणी सुरू असताना एस-२ या आरक्षित डब्यातून दोन व्यक्ती मोठ्या चार ते पाच बॅगांसह उतरताना दिसले. रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांना संशय आल्याने त्यांनी या दोघांची चौकशी केली असात त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे त्यांना रेल्वे सुरक्षा दलाच्या कार्यालयात आणण्यात आले.

उपनिरीक्षक प्रतिभा साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली पंचांसमक्ष दोघांचीही चौकशी करण्यात आली. **(पान २ वर..)**





**पनवेल : देवद गावच्या अश्मी मिथून दर्गे यांनी डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (डीएमएलटी) हे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या यशात त्यांना डॉ. महेंद्रकर, मोना जेठवा तसेच महेश जेटीथोर यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी माजी उपमहापौर व विद्यमान नगरसेविका सीता पाटील, भाजप नेते सदानंद पाटील, मिथून दर्गे आदी उपस्थित होते.**




## मातीच्या माठांना मागणी वाढली

### उन्हाच्या तडाख्यात नागरिकांची मिळतेय पसंती

**तळा : प्रतिनिधी**

उन्हाळा सुरू झाल्याने मातीच्या माठांची आवक वाढताना दिसत आहे. नैसर्गिकरित्या थंड पाणी माठातून मिळत असल्याने सध्या या माठांची मोठ्या प्रमाणात मागणी वाढल आहे.

उन्हाळ्याचे चटके बसू लागले की नागरिकांना अधिक पाण्याची आवश्यकता भासते. वारंवार पाणी पिऊनही तहान भागत नाही. अशा वेळी गार पाणी प्यावेसे वाटते. फ्रिजमधील थंड पाणी शरीराला बाधते, परंतु माठात नैसर्गिकपणे थंड होणाऱ्या पाण्याने कुठलाही त्रास वा अपाय होत नाही. त्यामुळेच सध्या माठाला मागणी दिसून येत आहे.



साध्या माठाची किंमत २०० ते २५० रुपये, तर नळ असणारा माठ २५० व ३०० रुपयांना विकला जात आहे. माठविक्रेते शहरांमध्ये तसेच गावोगावी फिरून आपला व्यवसाय करीत आहेत. मागील वर्षापेक्षा यंदा माठांना चांगली मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

# रायगडातील समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी

**अलिबाग : प्रतिनिधी**

सलग सुट्ट्यांमुळे रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी गर्दी केली. हजारो पर्यटक अलिबाग, नागाव, मुरूड आणि काशीदच्या समुद्र किनाऱ्यांवर दाखल झाले. किनाऱ्यांवर मनसोक्त हुंदडत, मौजमजा करीत त्यांनी सुट्टीचा आनंद घेतला.





गुरुवारी गुढीपाडव्याची सुट्टी, त्यानंतर शुक्रवारची रजा टाकून त्याला लागून शनिवार, रविवार सलग सुट्टी मिळाली. दहावी, बारावीसह काही शाळांच्या परीक्षाही संपल्या आहेत. मग फिरण्यासाठी उत्सुक आणि खवय्ये मंडळी घराबाहेर पडली. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुण्यासह राज्याच्या अनेक भागातून हजारो पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल झाले. अलिबाग, किहीम, आवास, सासवणे, वरसोली, आक्षी, नागाव, चौल, रेवदंडा, काशीद, नांदगाव, मुरुड, श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर येथे मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांची भरती आल्याचे चित्र पहायला मिळाले.

उन्हामुळे अंगाची काहिली होत असल्याने समुद्रात मनसोक्त डुंबून पर्यटक मंडळी आपल्या शरीराला थंडावा देण्याचा प्रयत्न करीत होती. यात बच्चेकंपनी आघाडीवर होती. पर्यटकांनी समुद्र स्नानाबरोबरच सागरी सफरीचा आनंद लुटला. एटीव्ही राईडस, बोटींगच्या विविध प्रकारांचा आनंद घेतला. घोडा व उंट सफारी केली. पर्यटकांचा ओघ वाढल्याने जिल्ह्यातील हॉटेल्स आणि लॉजेस पर्यटकांनी गजबजून गेले होते. त्यामुळे पर्यटनावर आधारित उद्योगांना सुगीचे दिवस आल्याचे दिसून आहे. दिवाळीनंतर सुरू झालेला पर्यटन हंगाम अशा सलग सुट्ट्यांच्या काळात अधिकच बहरलेला पहायला मिळतो आहे.

## खोपोलीच्या गारमाळ परिसरात बिबट्याचा वावर

### नागरिकांमध्ये भीती; वनविभागाकडून सतर्कता

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

घाटमाथ्यावर असलेल्या गारमाळ परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्या वावरत आहे. खोपोलीतील दोन जण मॉर्निंग वॉकसाठी गारमाळच्या जंगलातील रस्त्याने चालत असताना बिबट्याने त्याच्या पुढ्यात उडी मारल्याने त्यांची धावाधाव झाली. यावेळी पळताना त्यातील एक जण पडला. या घटनेमुळे येथे मॉर्निंग वाकसाठी येणाऱ्यांचे धाबे दणाणले असून परिसरातील नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे,

निसर्गरम्य गारमाळ परिसरात मोठे आणि घनदाट जंगल असून येथे अनेक जंगली प्राणी आहेत. त्यातच गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्या वावरत आहे. तो आता लोकवस्तीजवळ दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वी हा बिबट्या गारमाळच्या रस्त्यावर चक्क दहा मिनिटे तळ ठोकून बसला होता. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली आहे, तर येथील ग्रामस्थांच्या गाई, म्हशींचा बिबट्या फडशा पाडत असल्याने नुकसानही होत आहे.

या घटनेची वनविभागाने दखल घेतली आहे. ग्रामस्थांनी सतर्क राहून लहान मुलांची आणि पाळीव जनावरांची काळजी घेण्याचे आवाहन खोपोली वनविभागाचे अधिकारी भगवान दळवी यांनी केले आहे.

# 'महालक्ष्मी सरस' महिलांसाठी बाजारपेठेचा मोठा ब्रँड -मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ विक्रीचे ठिकाण नसून महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ म्हणून कार्य करत आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यात उमेद मॉल उभारण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या प्रदर्शनाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून महालक्ष्मी सरस हा प्रदर्शनाचा ब्रँड अधिक मजबूत होत आहे. राज्यात शंभर कोटी रुपयाचा व्यवहार बचत गटाच्या माध्यमातून होत असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी 'महालक्ष्मी सरस २०२६' प्रदर्शनाला भेट दिली. या प्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अर्थ व नियोजन



राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृपाल तुमाने, कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर आदी लोकप्रतिनिधी उपस्थिती होती.

महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये सुमारे ४०४ स्टॉल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत १० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. ही विक्री पुढील काळात आणखी वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

राज्यात ३ ठिकाणी महालक्ष्मी सरस प्रदर्शन भरविण्यात येते आणि या माध्यमातून सुमारे १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते यामुळे महिलांच्या उद्योगाना मोठी चालना मिळत असून पुढे त्यांना अधिक संधी निर्माण करून देण्याचे काम शासन करणार आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून महिला अर्थव्यवस्थेच्या प्रमुख घटक बनल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यात 'लखपती दीदी' अभियानांतर्गत १ कोटी महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे मॉल उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले. नागपूर येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन अत्यंत उत्तम झाले असून यासाठी १०० पैकी १०० गुण आयोजकांना देतो आणि महिलांसाठी महालक्ष्मी सरस च्या माध्यमातून मिळणारी हक्काची बाजारपेठ दरवर्षी नागपुरात उपलब्ध करून दिली जाईल, महिलांचे कौशल्य वाढविणे, त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग व मार्केटिंग करणे आणि त्यातून त्यांची उत्पादने परदेशात पाठविण्यासाठी शासन काम करनार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवसखी उद्योगिनी योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे काम मंत्री बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाने योजना आखून १ लाख रुपये महिला बचत समूहाना उपलब्ध करून दिले. आणि त्यातून खऱ्या अर्थाने महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे काम होत आहे असे मत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी व्यक्त केले.

## पाणथळ क्षेत्रात आणीबाणीचा इशारा

### नवी मुंबईतील रोहित पक्ष्यांचे अधिवास धोक्यात



**नवी मुंबईः बातमीदार**

जागतिक जलदिनानिमित्त पर्यावरण कार्यकर्त्यांनी पाणथळ आणीबाणीचा इशारा दिला असून, नवी मुंबईतील तीन प्रमुख रोहित पक्ष्यांच्या अधिवासांतील पाणी विषारी झाल्याचे अलीकडील प्रयोगशाळा तपासणीत समोर आले आहे.

नेरुळ येथील डीपीएस, एनआरआय आणि टी. एस. चाणक्य तलावांची स्थिती गंभीर असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. हे तलाव रामसर दर्जा प्राप्त ठाणे खाडी रोहित पक्षी अभयारण्याचे उप-पाणथळ क्षेत्र आहेत. नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या विनंतीवरून ठाण्यातील एसएसएएस प्रयोगशाळेत तपासलेल्या पाण्याच्या नमुन्यांनी पर्यावरणीय निकष पूर्ण केले नाहीत. या निष्कर्षांची माहिती पंतप्रधान आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना देत तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली आहे.

नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले की, यावर्षी या भागात रोहित पक्षी अद्याप आलेले नाहीत, ही गंभीर पर्यावरणीय सूचना आहे.

तपासणीत चार प्रमुख घटक-टीडीएस, पीएच, बीओडी आणि सीओडी-यांमध्ये मोठे बिघाड आढळले. टीडीएस (एकूण विरघळलेले घटक) १७,००० ते २३,००० मिग्रॅ/लिटर इतके नोंदले गेले, जे सामान्य पाणथळांपेक्षा खूप जास्त आहे. पीएच पातळी ९ पेक्षा जास्त आढळली, सर्व निर्देशांक एकच गोष्ट सांगतात-पाणी नैसर्गिकरित्या वाहत नाही, असे कुमार यांनी सांगत भरती-ओहोटीचा प्रवाह अडथळल्याचे नमूद केले.

सागर शक्ती संस्थेचे संचालक आणि पर्यावरण कार्यकर्ते नंदकुमार पवार यांनी सिडकोला जबाबदार ठरवत म्हटले, ही अवस्था सिडकोमुळेच झाली असून महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण आणि वन विभागाने केवळ बघ्याची भूमिका घेतली आहे. त्यांनी पाणथळांना सार्वजनिक संपत्ती असल्याचे सांगत त्यांचा उघडपणे ऱ्हास होत असल्याचा इशारा दिला.

पर्यावरणीय परिणाम गंभीर असल्याचे कार्यकर्त्यांनी नमूद केले. रोहित पक्षी अन्नासाठी सूक्ष्म जीवांवर अवलंबून असतात; पाण्याची गुणवत्ता खालावल्याने अन्नसाखळीच बिघडत आहे.सेव्ह फ्लेमिंगोज अँड मॅन्ग्रोव्हस फोरमच्या संयोजक रेखा सांखळा म्हणाल्या, ही पाणथळे आपला अभिमान होती. आज ती उघडपणे नष्ट होत आहेत. त्यांनी या प्रश्नाकडे सार्वजनिक आरोग्य संकट म्हणून पाहण्याचे आवाहन करत, एकदा नष्ट झाल्यावर ती आपल्या आयुष्यात परत निर्माण होणार नाहीत, असा इशारा दिला.

नवी मुंबई पर्यावरण संरक्षण संस्थेचे (एनएमईपीएस) प्रतिनिधी संदीप सरीन यांनी विषारी पाणी असल्याचे सांगत, न्यायालयीन आदेश असूनही सिडको विकासाला प्राधान्य देत पाणथळांचा नाश करत आहे, अशी टीका केली. रोहित पक्षी हे परिसंस्थेतील इशारा देणारे घटक आहेत-आता जबाबदारी निश्चित झाली पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

## तळा तालुक्यातील जमीन क्षेत्र बागायतीसाठी उपयुक्त

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा डोंगराळ भाग असल्याने या भागातील क्षेत्रात फळझाड क्षेत्र वाढविल्यास अर्थिक उत्पन्नासाठी एक चांगले साधन ठरेल.तालुक्यात अनेक भागात आंबा बागायतदार असून त्यातून उत्पन्न शेतकऱ्याला चांगला मिळत आहे.आंब्या सोबतच काजू,कोकम,फणस ,नारळ अशा फळझाडांची लागवड वाढविण्यास याभागात चांगले जमिन क्षेत्र आहे.

आजही या भागातील एक दोन गावाशेजारील राहटीमधे कोकम व फणसांची झाडे आहेत.त्याला मागणी होत असते.अशा प्रकारे जर का हे क्षेत्र वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी या फळझाडांची लागवड करून हे बागायती क्षेत्र वाढविले तर चांगले उत्पन्न मिळून अर्थिक लाभ मिळेल.अशीही फळ आहेत की या फळांपासून आमरस,आंबा पोळी,फणसपोळी,कोकमसरबत, काजूबीतून काजूगर काढून या पध्दतीने हे पदार्थ बाहेर अथवा स्थानिक पातळीवर विक्री करता येतील.हे एक शेतकऱ्यांसाठी चांगले व्यवसायाचे साधन होईल.

तालुक्यत आजही काही ठरावीक शेतकरी केळी लागवड करून केळ्याचे पिक चांगल्या प्रकाराने काढले जात असून चांगले उत्पन्न मिळाले



आहे. काही शेतकरी प्रायोगिक तत्त्वावर अशा फळ झाडांची लागवड करून त्यात चांगले पिक घेत असल्याचे पहावयास मिळत आहे.तालुक्यात डोंगराळ भाग मोठ्या प्रमाणात असल्याने डोंगराळ भागाचा फळझाड लागवडीसाठी चांगला उपयोग होईल.

## 'स्वत:पुरते न जगता समाजाचाही विचार करायला शिकवते ते मातृत्व'


**खोपोली : प्रतिनिधी** स्त्री तसेच मातृत्व हा नुसता लिंग वाचक शब्द नसून आपली मुले घडवताना त्यांचे संगोपन, शिक्षण, संरक्षण ,संस्कार या चारही गोष्टी मुलांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे. आपण फक्त स्वत:पुरते जगायचे नसून समाजाचे भान असायला हवे, हे मुलांपर्यंत पोहोचवणे म्हणजे मातृत्व, असे उद्गार पनवेल येथील सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा ओगले यांनी काढले.

मातृत्व एक सामाजिक दायित्वया विषयावर खोपोली ब्राह्मण सभेने व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी ओगले बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगिता वानखेडे उपस्थित होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पेठे,उपाध्यक्षा सपना पित्रे, कार्यवाह वृषाली बेलसरे उपस्थित होत्या.

ओगले यांनी जिजाबाई, अहिल्यादेवी होळकर, साने गुरुजी यांची म्हणजे श्यामची आई ही उदाहरणे देऊन त्यांनी आपल्या मुलांवर केलेले संस्कार, प्रसंगी कठोर होऊन त्यांना दिलेली सामाजिक जाणीव सांगितली. संगीता वानखेडे यांचेही याप्रसंगी समयोचित भाषण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री सरदेशपांडे यांनी केले. रेवती गजेंद्रगडकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यवाह वृषाली बेलसरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. उपाध्यक्षा सपना पित्रे यांनी आभार मानले.कीर्ती कुलकर्णी आणि सपना पित्रे यांनी वंदे मातरम् सादर केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.







## नवी दिल्लीत महापारेषणच्या डिजिटल स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवी दिल्ली येथे आयोजित भारत इलेक्ट्रिसिटी परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) आकर्षक व पर्यावरणपूरक आधुनिक तंत्रज्ञान केंद्रित स्टॉलला अभ्यागतांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक तसेच महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी स्टॉलला भेट देत महापारेषणच्या कार्याचे कौतुक केले.

नवी दिल्लीतील यशोभूमी, व्दारका येथे भरविण्यात आलेल्या या चार दिवसीय परिषदेत महापारेषणने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्टॉल उभारला होता. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली, संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण आणि अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्टॉल साकारण्यात आला.

या स्टॉलमध्ये महापारेषणची प्रगती, ध्येय-उद्दिष्टे तसेच भविष्यातील २०३० पर्यंतचे नियोजन याबाबत डिजिटल माध्यमातून माहिती सादर करण्यात आली. ड्रोन आणि मोबाईल ॲप तंत्रज्ञानाव्दारे पारेषण वाहिनी पेट्रोलिंग, एमटीएएमसी सबस्टेशन ऑटोमेशन प्रणाली यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती अभ्यागतांना देण्यात आली. या स्टॉलला परिषदेत उल्लेखनीय भेटी मिळाल्या असून देश-विदेशातील प्रतिनिधींनी महापारेषणच्या तांत्रिक प्रगतीचे विशेष कौतुक केले.

महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. राधाकृष्णन बी., तेलंगणा साऊथ वीज वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. जितेश पाटील, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री सतीश चव्हाण तसेच महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर यांनी स्टॉलला भेट देऊन समाधान व्यक्त केले.

## श्रीवर्धन शहरात पथदिवे उजेड असताना पेटतात, तर उजाडायच्या अगोदर विझतात!

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन नगर परिषदेने सी.आर.एस. फंडातून काही दिवसांपूर्वी पथदिव्यांचे लोकार्पण केले होते. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते सदर लोकार्पणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हे पथदिवे सुशोभित असे असून सदरचे दिवे सौरऊर्जेवर चालतील असे सांगण्यात आले होते. परंतु सदरचे दिवे अद्यापही महावितरणच्या विजेवर सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेवरती अधिकचे बील बिल भरण्याचा बोजा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच सदर लावलेल्या पथदिव्यांना टायमर पद्धत असून ही पद्धत अत्यंत चुकीची आहे.

सायंकाळी सहा वाजता दिवे लावण्यात येतात. परंतु त्या वेळेला चक्क ऊन पडलेले असते. तर टायमरनुसार सकाळ-सहा वाजता उजाडण्याच्या अगोदर दिवे बंद होतात. त्या वेळेला कुट्ट काळोख असतो. याबाबत नगर परिषदेला कळवून सुद्धा अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. श्रीवर्धन शहराच्या श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे प्रवेशदरापासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत, तर बागवान मशिदीपासून शासकीय विश्रामगृहाच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत हे दिवे बसविण्यात आले आहेत.

सदर पथदिव्यांच्या चालू व बंद करण्याच्या वेळेचे टायमर योग्य पद्धतीने हाताळून नगर परिषदेने योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

## माणगाव येथे सुरक्षा रक्षक भरतीला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ऍक्ट 2005 च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त , भारत सरकारच्या पसारा मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा. लि. पुणे आणि निलेश थोरे, जिल्हाध्यक्ष,भारतीय जनता युवा मोर्चा, दक्षिण रायगड,यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 21 मार्च 2026 ते 25 मार्च पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

आज भरती झालेल्या युवकांना लगेच निलेश थोरे याच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.यावेळी परेश सांगळे (भाजपा, माणगाव तालुकाध्यक्ष ), रचना निलेश थोरे (महिला



मोर्चा, तालुकाध्यक्ष )तसेच पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

या भरतीत बेरोजगार युवकांना पर्मनंट नोकरीं दिली जाणार आहे. त्याचबरोबर. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या अंतर्गत नवीन भरती होणाऱ्या युवकांना नोकरी लागल्यानंतर 15000 रुपये मिळतील. जे पेमेंट व्यतिरिक्त सरळ त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होतील. तसेच इतर सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा, मेडिकल, ग्रॅज्युटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड किंवा महाराष्ट्र मिनिमम वेज नियमाप्रमाणे पेमेंट मिळणार आहे जे 15 हजार ते 24हजार पर्यंत सुरुवातीस मिळेल व सर्व सूविधा दिल्या जातील. भरती होणाऱ्या तरूणांना महाराष्ट्रामध्ये मध्ये नौकरी दिली जाणार आहे,

ही भरती प्रक्रिया दि.21मार्च ते 25 मार्च पर्यंत सुरू राहणार आहे.

पान १ वरुन

## कर्जत रेल्वेस्थानकात गुटखा, पान मसाला जप्त

यावेळी त्यांनी आपली नावे गोलू कुमार राजेंद्र कुमार (वय २३, रा. कामोठे, पनवेल) आणि अंकुश कुमार हरी कुमार (वय २१, रा. कामोठे, पनवेल) अशी सांगितली. त्यानंतर त्यांच्या पाच बॅगांची तपासणी केली असता त्यामध्ये विविध प्रकारचा गुटखा, पान मसाला व तंबाखू मोठ्या प्रमाणात आढळून आला. यामध्ये विमल, राजश्री, रजनीगंधा, तुलसी जर्दा, व्ही-१ तंबाखू आदी ब्रँडचा समावेश असून एकूण दोन लाख ७१५ रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. मुद्देमाल पंचनामा करून रेल्वे सुरक्षा बलाच्या ताब्यात घेण्यात आला तसेच आरोपींची कर्जत येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

पुढील कारवाईसाठी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाचे निरीक्षक प्रशांत शिंदे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांच्या सूचनेनुसार आरोपी व जप्त माल कर्जत जीआरपी यांच्या ताब्यात देण्यात आला असून गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू करण्यात आला आहे.

## कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्या नियमित सुरू करा

### खासदार म्हस्के यांचे रेल्वेमंत्र्यांना पत्र

**ठाणे : रामप्रहर वृत्त**

कोकण रेल्वेच्या सर्वच गाड्यांचे अप आणि डाऊन मार्गावरचे वेळापत्रक पूर्णत: कोलमडले आहे. पाच ते सात तास विलंबाने गाड्या धावत आहेत. त्यामुळे खासदार नरेश म्हस्के यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत कोकणात जाणाऱ्या गाड्या नियमित सुरू करण्यासाठी खा. नरेश म्हस्के यांनी रेल्वे मंत्री आणि कोकण रेल्वेचे चेअरमन यांना खरमरीत पत्र लिहीत कायमस्वरूपी ठोस तोडगा काढण्याची सूचना केली आहे.



दरम्यान यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड संताप आणि नाराजीची लाट आहे. विलंबाने धावणाऱ्या रेल्वे गाड्यांमुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

खा. नरेश म्हस्के यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि कोकण रेल्वेच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या बहुतांश गाड्या या निर्धारित वेळेपेक्षा तासन्तास उशिराने धावत असून मार्च महिन्याचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, प्रीमियम समजली जाणारी सुपरफास्ट तेजस एक्स्प्रेस २२११९ ही गाडी सुमारे सात तास उशिराने धावत होती. तिकिटात जेवणाचा समावेश असून सुद्धा प्रवाशांना जेवण मिळालेले नाही. तर इतर एक्सप्रेस व प्रवासी गाड्यांची स्थिती किती बिकट असेल याची कल्पना करता येते नाही

## आरटीई प्रवेशासाठी एक किमी अंतराची अट रद्द; केल्याने पालकांना दिलासा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार दुर्बल व वंचित घटकाकरीता २५ टक्के ऑनलाईन प्रवेश सन २०२६-२७ प्रक्रियेसाठी असलेली १ किमी अंतराची अट रद्द करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अर्ज दाखल करण्यासाठी बुधवार (ता.२५) पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ज्या पालकांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी नोंदणी केली आहे, त्यांना आता १ ते ३ किमी. तसेच ३ किमी. पेक्षा अधिक अंतरावरील शाळा उपलब्ध झालेल्या आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा या शाळांमध्ये आरटीई २५ टक्के सन २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे.आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी १ किमी. पर्यंतच्या अंतरावरील शाळा निवडण्याचे स्वातंत्र्य पालकांना देण्यात आलेले होते.

# घेरावाडी ग्रामस्थांची पाणी समस्या मार्गी

## ◆ पं.स.सभापती रंजना वास्कर यांच्या प्रयत्नांना यश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पनवेल पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सभापती रंजना वास्कर यांनी आपल्या कार्यातून खऱ्या अर्थाने जनसेवेचा वारसा जपत एक हृदयस्पर्शी उदाहरण घालून दिले आहे.

पनवेल तालुक्यातील आपटा विभागातील डोंगरावर वसलेले घेरावाडी हे आदिवासी समाजाचे गाव ऐन उन्हाळ्यात तीव्र पाण्याच्या टंचाईने त्रस्त होते. ग्रामस्थांना पाण्यासाठी अक्षरशः वनवण करावी लागत होती. घेरावाडी येथील पाणी प्रश्न आम्ही मार्गी लावू, असे वचन पंचायत समिती सदस्य मयूर शेलार यांनी ग्रामस्थांना निवडणूक काळात दिले होते. त्यानुसार या गंभीर परिस्थितीची माहिती त्यांनी सभापती रंजना वास्कर यांना दिली.



त्यानुसार वास्कर यांनी तत्काळ पुढाकार घेत बोरवेल खोदण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अखेर घेरावाडीमध्ये पाण्याचा स्रोत उपलब्ध झाला आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला.

बोरवेलमधून पहिल्यांदा पाण्याचे उंच उडणारे फवारे बाहेर पडताना पाहून गावकऱ्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले होते-जणू त्यांच्या आयुष्यात पुन्हा एकदा आशेचा झरा उगवला होता. पाणी म्हणजे जीवन याची जाणीव करून देणारी ही घटना प्रत्येक कुटुंबासाठी अत्यंत दिलासादायक ठरली.

सभापती रंजना वास्कर स्वतः या ठिकाणी उपस्थित राहून ग्रामस्थांच्या भावना जाणून घेत होत्या. त्यांच्या या संवेदनशील आणि तत्पर कार्यामुळे ग्रामस्थांनी त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

या वेळी पंचायत समिती सदस्य मयूर शेलार, भाजप नेते तथा कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव वास्कर, आपटा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच ज्ञानेश्वर भोईर, सदस्य मारुती चव्हाण, दामू मांडे, दर्शन भोईर, राजू देशमुख, पंचायत समितीचे पाणीपुरवठा अधिकारी चव्हाण, ग्रामसेवक कैलास मोरे, जनार्दन सावंत, गणपत तिरकळ, आयत्या माडे, संतोष पारधी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घेरावाडीमध्ये उडालेल्या त्या पाण्याच्या फवाऱ्यांनी केवळ तहान भागवली नाही, तर गावकऱ्यांच्या मनात नवजीवनाची उमेद निर्माण केली. ग्रामस्थांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांचे मनापासून आभार मानले. शेवटी आदिवासी बांधवांच्या तोंडून एक वाक्य बाहेर पडले ते म्हणाले हीच खरी जनसेवा आहे जे भाजपकडून करण्यात येत आहे.

# कामोठ्यात अतिक्रमण हटवले; पमपाची कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'क' अंतर्गत अतिक्रमण विभागाच्या वतीने कामोठे येथील मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात अतिक्रमणाविरोधी कारवाई करण्यात आली. तसेच अग्निशमन दलासाठी राखीव असलेल्या प्लॉटवर झालेले अतिक्रमण हटविण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मानसरोवर स्थानक परिसरात अनाधिकृतपणे उभारण्यात आलेल्या टपऱ्या व झोपड्यांवरती जेसीबीच्या सहाय्याने प्रभाग समिती 'क' च्या अतिक्रमण विभागाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली. संबंधित विभागाच्या पथकाने नियोजनबद्धरीत्या ही मोहीम राबवून परिसर अतिक्रमणमुक्त केला.

याचबरोबर कामोठे येथील अग्निशमन दलासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या प्लॉट वरती अनधिकृत टपऱ्या, हातगाड्या, स्टॉल्स उभारण्यात आले होते. उपायुक्त नानासाहेब कामठे व सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग अधिक्षक दशरथ भंडारी यांनी जेसीबीच्या सहाय्याने याठिकाणी तोडक कारवाई करून संपूर्ण प्लॉट रिकामा केला.


महापालिकेच्या वतीने अशा प्रकारच्या अनधिकृत अतिक्रमणांवरती पुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## निवडक

### लालचंद यादव यांची निवड



**पनवेल :** पनवेल नवी मुंबई पत्रकार संघाची रविवारी बैठक पनवेल येथे पार पडून या बैठकीत पत्रकार लालचंद यादव यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवडीबद्दल नवनिर्वाचित अध्यक्ष लालचंद यादव यांचे पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचेअध्यक्ष राजेंद्र पाटील तसेच रायगड प्रेस क्लब जिल्हा कार्यकारणीचे सल्लागार संजय कदम व सर्व पत्रकार बांधवानी त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले आहेत.



**पनवेल : पटेल मोहल्ला येथील फाईझा सोहेल सोलकर या पाच वर्षीय चिमुरडीने रमजानचे रोजे (उपवास) केले. त्याबद्दल तिचे कुटुंबियांसह नातेवाईकांनी कौतुक करून तिला रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : येथील हनिफ कच्छी यांनी परिसरातील लहान रोजेदारांसोबत ईदचा आनंद साजरा केला.**

# लोकनेते दि.बा. पाटील स्मृती वन उभारण्याची मागणी

## ◆ विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन

**उरण : बातमीदार**

पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व्हावे, झाडे, वृक्ष वेली आदीचे महत्व येणाऱ्या भविष्यातील नवीन पिढीला समजावे, पर्यावरण विषयक जनजागृती व्हावे या अनुषंगाने उरणमधील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेल्या व वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवून जनजागृती करणाऱ्या विजय विकास सामाजिक संस्थेने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लोकनेते दि. बा. पाटील स्मृती वन उभारण्याची मागणी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्याचबरोबर खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आलेला ३०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम हा पर्यावरण संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण व स्तुत्य असा उपक्रम आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील महान नेत्यांच्या स्मृती जपण्याची आणि पर्यावरण रक्षणाची दुहेरी संधी निर्माण झाली आहे.

रायगड व नवी मुंबई परिसरातील शेतकरी, कष्टकरी आणि आगरी समाजाचे नेतृत्व करणारे लोकनेते दि. बा. पाटील यांनी आयुष्यभर स्थानिक जनतेच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या त्याग, नेतृत्व आणि कार्यामुळे संपूर्ण परिसरातील जनतेच्या मनात त्यांचे स्थान अत्यंत आदराचे आणि प्रेरणादायी आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित करण्यात आली. या विकासकामांच्या प्रक्रियेत त्या परिसरातील अनेक झाडे तोडली गेली. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसानही झाले आहे. या पार्श्वभूमीवर त्या परिसरात पुन्हा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून पर्यावरण संतुलन राखणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने विजय विकास सामाजिक संस्था, नवघर तसेच स्थानिक जनता आणि आगरी समाज यांची अशी ठाम मागणी आहे की, नवी मुंबई विमानतळ परिसरात विशेष वृक्षलागवड करून लोकनेते दि. बा. पाटील स्मृती वन उभारण्यात यावे. या स्मृती वनामध्ये हिंदू संस्कृतीत पूजनीय आणि पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाची झाडे जसे वड, पिंपळ, औदुंबर, कडुलिंब, बेल इत्यादी मोठ्या प्रमाणावर लावण्यात यावीत.अशी मागणी विजय विकास संस्थेने केली आहे.

अशा प्रकारे उभारण्यात येणारे लोकनेते दि. बा. पाटील स्मृती वन हे केवळ पर्यावरण संवर्धनाचे प्रतीक ठरणार नाही, तर ते लोकनेते दि. बा. पाटील यांच्या महान कार्याचे स्मरण करून देणारे एक प्रेरणास्थान ठरेल. भविष्यातील पिढ्यांना या स्मृती वनातून प्रेरणा, ऊर्जा आणि सामाजिक जाणीव मिळेल, असा ठाम विश्वास विजय विकास सामाजिक संस्थेचे विजय भोईर, विकास भोईर यांनी व्यक्त केला आहे.

मागणीचा सकारात्मक विचार करून शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करून लोकनेते दि. बा. पाटील स्मृती वन उभारण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी विजय विकास सामाजिक संस्था, नवघर तसेच स्थानिक जनता आणि आगरी समाज यांच्या वतीने करण्यात आहे. या मागणीबाबत खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाधिकारी रायगड आदी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे लवकरात लवकर दि.बा. पाटील स्मृती वन उभारण्यात यावे, अशी मागणी आता सर्वच स्तरातून होत आहे.

# भवानी फाऊंडेशनतर्फे रक्तदान शिबिर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

भवानी फाऊंडेशनने एमजीएम कामोठे हॉस्पिटलच्या सहकार्याने काल शनिवारी आयोजित केलेल्या २५व्या रक्तदान शिबिरात १४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

भवानी फाऊंडेशनतर्फे सामाजिक बांधिलकी म्हणून अध्यक्ष के.डी.शेट्टी, संचालक जिक्षित शेट्टी, शिखा शेट्टी, सरीता शेट्टी, प्रियांका शेट्टी आदी संचालकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेले २५वे रक्तदान शिबिर होय. या पूर्वी मागील काळात आयोजित करण्यात आलेल्या या विविध रक्तदान शिबिरात चार हजारांहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

नवी मुंबईतील सीबीडी - बेलापूर येथील व्ही-टाईम्स स्क्वेअर, सेक्टर- १५ येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. डॉ.नितिश झवर, हरीष इंगळे, उमा आहुजा, सत्या बाबू नायडू आदींच्या उपस्थितीत शिबिर झाले.



# बियरच्या साठ्यासह रोख रकमेची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

केळवणे फाटा येथील कोकण किंग बियर शॉपी या दुकानातून तीन अज्ञात चोरट्यांनी बियरची सहा खोकी व रोख रकमेची चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात तीन चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष पाटील यांचे हे दुकान दररोज सुरू असते. येथील कामगाराने दुकानाच्या गल्ल्यात दिवसभराची रोकड ठेवून तो घरी निघून गेला होता. एका व्यक्तीने त्यांना या दुकानाचे शटर कोणीतरी उचकटलेले असल्याचे कळवले. चोरट्यांनी दुकानाच्या गल्ल्यातील रोकड व बिअरच्या बाटल्यांची सहा खोकी असा एकूण ३६ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याचे आढळले. त्यावर पाटील यांनी दुकानात आणि बाहेर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे चेक करून पाहिले असता, २० ते २५ वयोगटांतील अज्ञात तीन जणांनी ही चोरी केल्याचे त्यांना समजले.

# आज जागतिक हवामान दिन

जागतिक हवामान दिन दरवर्षी २३ मार्च रोजी साजरा केला जातो. जागतिक हवामान संघटनेची २३ मार्च १९५० रोजी झालेली स्थापना आणि हवामानशास्त्रातील योगदानाच्या स्मरणार्थ १९६१ पासून हा दिवस पाळला जातो. हवामान बदल, सुरक्षितता आणि मानवी कल्याणासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा याचा मुख्य उद्देश्य.

जसे की, आपणास माहीतच आहे की, विश्वात बरेच दिवस साजरे केले जातात. त्यापैकी २३ मार्च हा सुद्धा दिवस जगात जागतिक हवामान दिन म्हणून साजरा केला जातो. तो दिवस साजऱ्या करण्यामध्ये उद्देश्य हाच असतो की, लोकांमध्ये जनजागृती करणे, जे काही वाईट होत असेल त्यावर उपाय करणे, भविष्याचा वेध घेणे. त्याची अंमलबजावणीसाठी व्यवस्थित आयोजन करणे. लोकांमध्ये जनजागृती करून लोकांना त्यामध्ये समाविष्ट करून घेणे आणि ती उपाययोजना यशस्वी करणे असा असतो.

साधारणतः ७० वर्षा पूर्वीचा जर आपण आपल्या भारतातील हवामानाचा इतिहास बघितला तर आपल्याला काय आढळून येईल की, ७ जून म्हणजे सात जुनलाच मान्सून सुरु व्हायचा. हे कालचक्र नियमित रूपाने चालू असायचे. बरोबर ४ महिन्यांचा पाऊस पडायचा. पावसाळ्यात भरपूर पाऊस पडायचा. नदी नाल्यात पूर यायचा. धरणे, तलाव तुडुंब भरायची आणि वर्षभर पाण्याची चिंता दूर व्हायची.

त्यानंतर ऑक्टोबर ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत थंडी पडायची. थंडी पण भरपूर पडायची. थंडी पडल्यामुळे गव्हासारख्या पिकांना पोषक असे हवामान मिळायचे. गहू आणि हरभऱ्याचे पीक थंड वातावरणामुळे चांगले यायचे. आता थंडी गायब झाल्यामुळे त्याचा परिणाम पिकांवर होत आहे. त्यानंतर मार्च ते जून उन्हाळा असायचा. उन्हाळ्यात भरपूर उष्ण हवामान असायचे. आपली जमीन भरपूर तपायची, त्यामुळे यौग्य ती प्रक्रिया घेऊन अगदी वेळेत ७ जूनला मान्सून सुरु होऊन पावसाळा वेळात सुरु व्हायचा.

आता हे कालचक्र, ही सायकल हवामानाच्या बदलामुळे पूर्णतः बदललेली आहे. आता वेळी-अवेळी पाऊस पडतो. त्यामुळे पिकांचे भरपूर नुकसान होते व शेतकरी खूपच हवालदिल झाला आहे. अर्थातच अन्नधान्य, फळे, फुलांच्या उत्पादनावर परिणाम होतो आहे. अन्नधान्य व फळे यांचे उत्पादन कमी झाल्यामुळे त्यांच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आह. त्याचा परिणाम म्हणून महागाई मोठ्या प्रमाणात वाढते व सामान्य जनता ही खरेदी करू शकत नसल्यामुळे त्यांच्या स्वास्थावर परिणाम होऊन ते आजारी पडतात व नंतर ते मृत्युमुखी पडतात. असे चित्र हवामानात बदल झाल्यामुळे आपल्याला बघायला मिळत आहे.

जागतिक हवामान दिवस हा साजरा केला जातो तो पृथ्वीचे हवामान, हवामानशास्त्र आणि पाण्याशी संबंधित बदलांविषयी लोकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी. हा दिवस साजरा करण्यामागे हा उद्देश असतो की, हवामान बदलाचे परिणाम नैसर्गिक आपत्ती जसे की, वादळ, पूर आणि दुष्काळ आणि त्यापासून संरक्षणाचे उपाय यावर प्रकाश टाकण्यासाठी.

हवामान बदल झाल्यामुळे जागतिक तापमानातवाढ, अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी आणि समुद्रसपाटीमध्ये वाढ यासारख्या गंभीर समस्यांना कारणीभूत ठरत आहे. यामुळे कृषी उत्पादनामध्ये घट होते, आरोग्य समस्यांमध्ये वाढ होते. जैवविविधतेचा ऱ्हास आणि नैसर्गिक आपत्ती मध्ये वाढ होऊन मानवी जीवनावर व पर्यावरणावर विनाशकारी परिणाम होत आहेत.

पावसाचे अनिश्तिच प्रमाण आणि वाढते तापमान यामुळे पिकांचे मोठा नुकसान होते. ज्यामुळे अन्नटंचाईची समस्या निर्माण होते. कडाक्याची उष्णता, उष्णतेच्या लाटा आणि श्वसनाचे आजार, हृदयविकार व संसर्गजन्य रोगांमध्ये वाढ होते. वादळे, पूर ढगफुटी आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीचा वारंवारता आणि तीव्रता वाढते. हिमनद्या वितळतात व त्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. ज्यामुळे किनारपट्टीवरील शहरे बुडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

हवामान बदलावर उपाययोजना करणे फार गरजेचे आहे. ह्यात वृक्षारोपण आणि जंगल संवर्धन करणे फार गरजेचे आहे कारण झाडे कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात. ह्यात जास्तीत जास्त झाडे लावणे आणि अस्तित्वात असलेली जंगले वाचवणे हा सर्वात महत्वाचा उपाय आहे. नवीकरणीय ऊर्जेचा वापर करणे गरजेचे आहे. कोळसा आणि तेल ऐवजी सौर ऊर्जा, पावन ऊर्जा आणि जलविद्युत यांसारख्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविणे गरजेचे आहे.

एकंदरीत पृथ्वीचे तापमान दिवसें दिवस वाढतच आहे. पुढच्या पिढीसाठी आपण काळजी घेणे फार गरजेचे आहे. हवामानामुळे ॲलर्जीसारखे विकार वाढत आहेत. मानवाच्या आरोग्यासाठी हवामानाची काळजी घेणे नितांत गरजेचे आहे. सामूहिक प्रयत्नामुळे आपण नक्कीच हवामान चांगले राखण्यासाठी कटिबद्ध असू असे हवामान दिनानिमित्त घेतलेली उजळणी.

**-अरविंद मोरे, नवीन पनवेल**

## चवदार तळे परिसराचे सुशोभीकरण

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीतर्फे मुख्यमंत्र्यांचे आभार

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र सरकारने चवदार तळे परिसराच्या सुशोभीकरणासाठी सुमारे ५७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीच्या वतीने चवदार तळे महाड येथे ९९ वा क्रांती दिन करण्यात आला. या कार्यक्रमाला पक्षाचे अध्यक्ष सागर भाई संसारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सभेच्या अध्यक्षस्थानी रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे होते. त्याचबरोबर मुंबई प्रदेश अध्यक्ष अमित हिरवे, महासचिव अशोक जी वाघमारे, रायगड जिल्हा उपाध्यक्ष विजय धोत्रे, महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव, श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सहयोग लोखंडे, पनवेल विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष निलेश कांबळे आदी उपस्थित होते.



यावेळी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांनी भीम गीताचा कार्यक्रम केला. त्याचबरोबर अनेक गायकांनी भीम गीते गायले. या सभेसाठी हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्र सरकारने चवदार तळे परिसराच्या सुशोभीकरणासाठी सुमारे ५७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे महाराष्ट्राच्या सर्व भीम बांधवांच्या वतीने व पक्षाच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

## बंगल्यातून दागिने आणि पैशांची चोरी

**पनवेल :** बंगल्याची लोखंडी जाळी उचकटून आत मध्ये प्रवेश करून चोरांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुरेंद्रकुमार अशोक सिंग हे नवीन पनवेल सेक्टर १२ येथे राहत असून ते त्यांच्या गावी गेले होते. गावाहून परत आले असता हॉलच्या दरवाजाचे लॅच तुटलेले व घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. चोरांनी एक लाख ९६ हजार रुपयांचा ऐवज चोरला.

# विद्यार्थ्यांनी चिमण्यासाठी बनविले घरटे

**उरण : बातमीदार**

रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, आवरे (उरण) येथे जागतिक चिमणीदिन निमित्ताने फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन)ची वेस्ट मधून बेस्ट या संकल्पनेतून चिमणी घरटे बनविण्याची कार्यशाळा पार पडली.

फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन)च्या टीम द्वारे विद्यार्थ्यांना कागदी पुठ्ठ्याच्या टाकाऊ रोलपासून चिमण्यांची घरटी बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. १०० घरटी बनवून ती विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली.



या कार्यशाळेस विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, सर्व शिक्षकवृंद व सहकाऱ्यांचे योगदान लाभले. फॉन संस्थेच्या वतीने जयवंत ठाकूर व दिनेश चिरनेरकर हे सहभागी झाले होते.

## संपादकीय

# मोदी ब्रँडचा डंका

भारताच्या लोकशाही प्रवासात काही टप्पे केवळ सत्तांतराचे नसतात, तर ते नेतृत्वाच्या सातत्याचे आणि जनमानसावर उमटलेल्या ठशांचे प्रतीक ठरतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनात्मक पदांवरील ८,९३१ दिवस पूर्ण करत नोंदवलेला विक्रम हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर तो भारतीय राजकारणातील स्थैर्य, व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आणि जनाधाराच्या सातत्याचा द्योतक आहे.

**या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व समजून घेताना दोन बाबी विशेष ठळकपणे समोर येतात. पहिली म्हणजे विविधतेने नटलेल्या, प्रचंड मतभिन्नता असलेल्या देशात एखाद्या नेत्याने इतक्या दीर्घकाळ सत्तेवर राहणे ही अपवादात्मक बाब आहे. दुसरी म्हणजे हा कालखंड केवळ एका पदापुरता मर्यादित नसून मुख्यमंत्री आणि पंतप्रधान अशा दोन वेगवेगळ्या स्तरांवरील सत्तेचा अनुभव एकत्रित करणारा आहे. नरेंद्र मोदी यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात संघटनात्मक पातळीवर झाली. कार्यकर्त्यापासून ते संघटन कौशल्य विकसित करत त्यांनी २००१मध्ये गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा स्वीकारली. त्या काळात राज्य अनेक आव्हानांना सामोरे जात होते. प्रशासनातील बदल, विकासाची नवी मांडणी आणि उद्योगस्नेही धोरणे यामुळे गुजरातच्या विकास मॉडेलची चर्चा देशभरात सुरू झाली. हा कालखंड मोदी यांच्या नेतृत्वशैलीचा पाया घालणारा ठरला. २००१ ते २०१४ या काळात त्यांनी गुजरातमध्ये सलग सत्ता राखली. या काळात विकास, पायाभूत सुविधा, गुंतवणूक आकर्षित करणे आणि प्रशासनातील वेग या मुद्द्यांवर त्यांनी भर दिला. त्यावेळी त्यांच्या कारभारावर टीकाही झाली. विशेषतः सामाजिक समतोल आणि काही संवेदनशील घटनांच्या पार्श्वभूमीवर, पण या सर्वांवर मात करत त्यांनी आपली राजकीय पकड कायम ठेवली. २०१४ हे वर्ष भारतीय राजकारणासाठी निर्णायक ठरले. मोदी राष्ट्रीय स्तरावर उदयास आले आणि प्रचंड बहुमतासह त्यांनी केंद्रात सत्ता स्थापन केली. पंतप्रधान म्हणून त्यांच्या कार्यकाळात अनेक धोरणात्मक निर्णय घेतले गेले, ज्यात आर्थिक, परराष्ट्र, सुरक्षा आणि डिजिटल क्षेत्रातील बदलांचा समावेश आहे. 'नवभारत' घडवण्याच्या दृष्टीने त्यांनी स्वतःची स्पष्ट छाप उमटवण्याचा प्रयत्न केला. या दीर्घ कार्यकाळात सातत्याने जनतेचा पाठिंबा मिळवणे हे सोपे काम नाही. २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवणे हे त्यांच्या राजकीय भक्कमतेचे द्योतक आहे. भारतीय मतदारांच्या अपेक्षा सतत बदलत असतात. अशा परिस्थितीत एकाच नेतृत्वावर विश्वास ठेवणे हे त्यांच्या कामगिरीचे आणि प्रतिमेचे फलित मानावे लागेल. पवन कुमार चामलिंग यांच्या विक्रमाशी तुलना करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते की त्यांनी एका राज्यात सलग सत्ता राखली, तर मोदी यांनी राज्य आणि केंद्र या दोन्ही स्तरांवर दीर्घकाळ नेतृत्व केले. त्यामुळे मोदींचा विक्रम अधिक व्यापक आणि बहुआयामी ठरतो. हा केवळ कालावधीचा विक्रम नाही, तर विविध स्तरांवरील प्रशासनिक अनुभवाचा एकत्रित परिणाम आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक पटलावर आपली उपस्थिती अधिक ठळक केली आहे, हे मान्य करावे लागेल. परराष्ट्र धोरणातील सक्रियता, आंतरराष्ट्रीय मंचांवरील सहभाग आणि भारताची वाढती आर्थिक ताकद यामुळे देशाची प्रतिमा उंचावली आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे मोदी हे स्वातंत्र्योत्तर भारतात जन्मलेले पहिले पंतप्रधान आहेत. त्यामुळे त्यांचा दृष्टिकोन आणि कार्यशैली पारंपरिक राजकारणापेक्षा काहीशी वेगळी असल्याचे दिसून येते. त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर, थेट संवाद आणि वैयक्तिक प्रतिमा यावर विशेष भर दिला आहे. यामुळे त्यांनी एक वेगळा राजकीय ब्रँड तयार केला आहे.**

# पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण काळाची गरज

२१ मार्च रोजी साजरा होणारा 'जागतिक वन दिन' हा मानव आणि निसर्ग यांच्यातील दृढ नात्याची जाणीव करुन देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. वाढत्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड, संवर्धन आणि संगोपन ही गरजेबरोबरच सामूहिक जबाबदारी बनली आहे. पर्यावरणाचा समतोल आणि संतुलन राखण्यासाठी खासगी आणि सामूहिक जमिनींवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन वनांचे प्रमाण वाढवणे, जैवविविधता वाढवणे, टिकवणे आणि संवर्धन करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत..



### राज्यातील वनक्षेत्राची स्थिती

राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के भागावर वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. यामुळेच पर्यावरणाचा समतोल व संतुलन राखणे तसेच संवर्धन करणे शक्य होते. महाराष्ट्रात ३०७ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ६१.३५ लाख हेक्टर जमीन वृक्षाच्छादित असून हे प्रमाण साधारण २० टक्के आहे.

जागतिक तापमानवाढ, वातावरणीय बदल, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, ढगफुटी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे पर्यावरणाच्या संतुलनात आणि जैवसृष्टीच्या स्थिरतेमध्ये (Ecological stability) सातत्याने बदल होत आहेत. पर्यावरणाचे असंतुलन, वाढते प्रदूषण आणि त्यातून होणाऱ्या बदलाचा थेट परिणाम मानवी जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर वन व वन्य जीवांचे संरक्षण, संवर्धन व संगोपनासाठी वन विभाग व वन्यजीव विभाग अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहे.

### जैवविविधतेसाठी सामाजिक वनीकरण

सामाजिक वनीकरण विभागामार्फत खासगी आणि सामूहिक जमिनींवर वृक्ष लागवड करून वृक्षाच्छादन वाढविण्याचे काम सातत्याने केले जात आहे. राज्यात त्या त्या क्षेत्रातील मातीचा स्तर, हवामान आणि पर्जन्यमान यांचा विचार करुन स्थानिक, दुर्मिळ व औषधी वृक्षांची लागवड करण्यात येते. त्याचबरोबर व्यापारी उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या वृक्ष लागवडीबाबत कौशल्य मिळवून देण्याचे काम सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने केले जाते. यामुळे जैव विविधता वाढविणे, टिकविणे आणि संवर्धन करणे शक्य होत आहे.

### कोल्हापूर सामाजिक वनीकरणाचा रोप लागवडीवर भर

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिनस्त १० परिक्षेत्र कार्यालयांमार्फत २०२५ च्या पावसाळ्यात ४९ हेक्टर वनेत्तर क्षेत्रावर ५४ हजार ४३९ रोपांची लागवड करण्यात आली. या रोपांचे संगोपन व देखभाल प्रभावीपणे करण्यात येत असून जिवंत रोपांचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक आहे, ही बाब उल्लेखनीय आहे.

### लक्षावधी रोपांची निर्मिती

कोल्हापूर सामाजिक वनीकरण विभागामार्फत २०२६ च्या पावसाळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर रोप निर्मिती करण्यात येत आहे. वन महोत्सव कालावधीत विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध यंत्रणांना रोपे उपलब्ध करुन देण्यासाठी सुमारे ९.४३ लाख रोपांची निर्मिती केली जात आहे. यात लहान आकाराच्या पिशवीतील ८.३५ लाख आणि उंच आकाराच्या पिशवीतील १.०८ लाख रोपांचा समावेश आहे. रोपवाटिकांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा देऊन उत्कृष्ट दर्जाची रोपे तयार केली जात आहेत.

### पर्यावरण जनजागृती आणि शिक्षणावर भर

केंद्र सरकारच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील १०० हरितसेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. सामाजिक वनीकरण विभागाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी आणि जनजागृतीवर विशेष भर दिला जात आहे.

### समन्वयातून वृक्ष लागवड

वैश्विक तापमानवाढ, ऋतूचक्रातील बदल आणि नैसर्गिक आपत्तींच्या वाढत्या प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. यासाठी पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, कृषी विभाग, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांसारख्या विविध विभागांच्या समन्वयातून वृक्ष लागवडीचे कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. सामाजिक वनीकरण विभाग या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे.

### वनीकरणाचे व्यापक कार्यक्रम

रस्ते, कालवे, रेल्वे लाईन यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड, टेकड्यांचे हरितीकरण, सामूहिक पातळीवर वनीकरण कार्यक्रम तसेच 'अटल आनंद घन वन', 'पंचायत वन', 'बेल वन' आणि 'अमृत वन' यांसारख्या योजनांद्वारे व्यापक वनीकरण कार्यक्रम राबविले जात आहेत.

### लोकसहभागावर विशेष भर

'वनमहोत्सव योजने'अंतर्गत दरवर्षी १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाते. शासनामार्फत सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध करुन दिल्यामुळे नागरिकांचा सहभाग वाढत आहे. वृक्ष लागवड आणि संगोपन हा लोकांचा कार्यक्रम व्हावा, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

### पर्यावरण रक्षणासाठी अनेक उपक्रम

वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पर्यावरण संवर्धनासाठी जास्तीत जास्त रोपांची लागवड व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी, शेतीचे बांध, पडीक जमिनीवर रोजगार हमी योजना तसेच अमृत महोत्सवी फळझाड वृक्ष लागवड व फूल पीक लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड केली जात आहे. वनेत्तर क्षेत्र वनाखाली आणण्याच्या उद्देशाने 'कन्या वन समृद्धी योजना' राबवण्यात येत असून मुलीच्या जन्मानिमित्त वृक्ष लागवड केली जाते. या योजनेअंतर्गत मुलगी जन्माला आल्यावर अशा शेतकरी दांपत्याने शासनाच्या मदतीने मुलीच्या नावे १० वृक्षांची लागवड केली जाते.

शहरी, ग्रामीण भागात प्रबोधनातून वृक्ष लागवड-हरित महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना ही योजना राबवली जात आहे. या संकल्पनेतून 'शुभेच्छा वृक्ष', 'शुभमंगल वृक्ष', 'आनंद वृक्ष', 'माहेरची झाडी' आणि 'स्मृती वृक्ष' यांसारख्या उपक्रमांद्वारे वृक्ष लागवड ही लोकचळवळ बनविण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच वृक्षाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने शहरी व ग्रामीण भागातील शाळा महाविद्यालयांमध्ये इको-क्लब, प्रकल्प कार्य निसर्ग कॅम्पिंग आणि मिशन लाईफ यासारखे उपक्रम राबवले जात आहेत. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत हरित सेना शाळांमध्ये निसर्ग, शाश्वत विकास आणि पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रबोधनपर कार्यशाळा घेतल्या जाताहेत. निसर्ग शिबिरे आणि विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरुकता निर्माण केली जात आहे.

राज्यातील वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग प्रभावी प्रयत्न करत आहे. तथापि, पर्यावरण संवर्धन ही समाजातील प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी असून जास्तीत जास्त झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे आणि वनेत्तर क्षेत्र वनाखाली आणणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचा समतोल, संतुलन राखण्यासाठी, जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी आणि भावी पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी सामाजिक वनीकरण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. जागतिक वन दिनाच्या निमित्ताने हरित महाराष्ट्र ही संकल्पना साकारण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या योजनांमध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. चला तर मग, वृक्षारोपण करुया आणि पर्यावरणाचा समतोल राखूया !

**-किशोरकुमार मारुतराव येळे,**
विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर



## बदलते तंत्रज्ञान

# महिंद्रा इए ६ चे बॅटमॅन एडिशन पुन्हा लॉन्च

महिंद्रा अँड महिंद्राने आपली लोकप्रिय इलेक्ट्रिक एसयूव्ही इए ६ ची स्पेशल बॅटमॅन एडिशन भारतात पुन्हा एकदा लॉन्च केली आहे. याची एक्स-शोरूम किंमत २८.४९ लाख रुपये आहे, तर, चार्जरसाठी वेगळे ५०,००० ते ७५,००० द्यावे लागतील.



स्पेशल एडिशनच्या मागणीमुळे महिंद्राने ही पुन्हा रिलॉन्च केली आहे. महिंद्रा इए ६ बॅटमॅन एडिशनची बुकिंग १० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू झाले यावेळी २४ तासांत जेवढ्या बुकिंग मिळतील, कंपनी तेवढ्याच गाड्या बनवेल आणि २० एप्रिल २०२६ पासून डिलिव्हरी सुरू करेल.

कंपनीने मागील वेळी फक्त ३०० युनिट्सची विक्री केली होती. महिंद्राने BE६ च्या या स्पेशल एडिशनसाठी DC कॉमिक्ससोबत भागीदारी केली आहे. ही कार पूर्ण चार्ज केल्यावर ६८२km ची रेंज देते. ही गाडी भारतात टाटा कर्व्ह ईव्ही, ह्युंदाई क्रेटा इलेक्ट्रिक आणि एमजी झेडएस ईव्हीला टक्कर देते.


ही स्पेशल एडिशन BE ६ च्या टॉप 'पॅक थ्री' व्हेरिएंटवर आधारित आहे, परंतु यात 'डार्क नाईट' चित्रपटातून प्रेरित अनेक बदल करण्यात आले आहेत. संपूर्ण कार सॅटिन ब्लॅक पेंटमध्ये येते. फ्रंट फेंडर, व्हील कॅप आणि मागील बंपरवर बॅटमॅनचा लोगो देण्यात आला आहे.

कारच्या सस्पेंशन आणि ब्रेक कॅलिपर्सना गोल्डन फिनिश देण्यात आली आहे. यात मोठे २०-इंचचे अलॉय व्हील्स मिळतात. याच्या पॅनोरमिक ग्लास रूफमध्ये लाल रंगाची बॅटमॅन थीम असलेली लाइटिंग आहे. तसेच, पडल लॅम्प्स जमिनीवर बॅटमॅनचा लोगो प्रोजेक्ट करतात.

आत तुम्हाला प्रीमियम 'बॅटमॅन' कारचा अनुभव मिळतो. केबिन पूर्णपणे काळ्या रंगात ठेवण्यात आली आहे, ज्यात डॅशबोर्ड आणि सेंटर कन्सोलवर गोल्डन ट्रिम्सचा वापर करण्यात आला आहे.सीट्सवर ब्लॅक स्वेड लेदर फिनिशसह गोल्डन स्टिचिंग आणि बॅटमॅन लोगो देण्यात आला आहे. सेंटर कन्सोलवर एक गोल्डन प्लेट लावलेली आहे, ज्यावर प्रत्येक कारचा एक युनिक प्रोडक्शन नंबर लिहिलेला असेल.

स्टीअरिंग व्हीलवरील बूस्ट मोड बटणावरही बॅटमॅनचा लोगो आहे.सुरक्षिततेच्या दृष्टीने यात ७ एअरबॅग्स, इलेक्ट्रॉनिक स्टेबिलिटी कंट्रोल आणि सुरक्षिततेची अनेक आधुनिक वैशिष्ट्ये मिळतात.

# मराठी चित्रपट अभिनेते गणपत पाटील



## निमित्त

कलावंतांना शाप असतो त्यांच्या ठराविक चौकटीत जगण्याचा! प्रेक्षकांनासुद्धा कलाकाराला त्याच प्रतिमेच्या चौकटीत, त्याच भूमिकेत कायम पाहायचे असते. मराठीतील ज्येष्ठ कलावंत निळू फुले खलनायकाच्या इमेजच्या चौकटीत असे अडकले की, इच्छा असूनही त्यांच्या इतर भूमिका प्रेक्षक स्वीकारत नव्हते. ज्येष्ठ अभिनेते गणपत पाटील हे अशाच एका प्रतिमेत अडकले आणि त्यांची प्रतिमा त्यांच्या आयुष्याची शोकांतिका बनली. त्यांचा जन्म कोल्हापूर येथे गरीब कुटुंबात झाला. लहानपणीच वडिलांचे निधन झाल्यामुळे घरची सर्व जबाबदारी त्यांच्या आईवर पडली. आपली व आपल्या सहा भावंडांची जबाबदारी एकट्या आईवर पडलेली असल्यामुळे गणपत पाटील मिळेल ते काम करू लागले. याचदरम्यान कोल्हापुरात होणाऱ्या मेळ्यांमध्ये ते कामे करू लागले. कोल्हापुरात त्या काळी चालणाऱ्या रामायणाच्या खेळांत ते हौसेने अभिनय करीत. रामायणाच्या त्या खेळांमध्ये त्यांनी बऱ्याचदा सीतेची भूमिका वठवली. दरम्यान, राजा गोसावी यांच्याशी त्यांची ओळख झाली. या ओळखीतून त्यांचा मास्टर विनायकांच्या 'शालिनी सिनेटोन'मध्ये 'प्रफुल्ल पिक्चर्स'मार्फत चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला.

मराठी सिनेमातून सोंगाड्या-नाच्याची भूमिका करीत करत गणपत पाटील यांनी त्या भूमिकेवर आपला एक स्वत:चा ट्रेडमार्क बनवला. तमाशातील 'नाच्या' म्हणजे गणपत पाटील असे समीकरणच बनले. त्यांचा रूपेरी पडद्यावर प्रवेश चाळीसच्या दशकात झाला. भालजी पेंढारकर यांच्या 'मीठ भाकर' या सिनेमात गणपत पाटील चक्क खलनायक होते. त्या काळात जयशंकर दानवे दिग्दर्शित काही नाटकातून त्यानी सोंगाड्याची भूमिका केली. नंतर सिनेमात ही त्यांच्याकडे अशाच भूमिका येऊ लागल्या.

१९६४साठी आलेल्या 'वाघ्या मुरळी' या चित्रपटापासून गणपत पाटील यांनी मराठी सिनेमा 'नाच्याची' भूमिका करायला सुरुवात केली आणि गणपत पाटील काय परफेक्ट भूमिका वठवत असे. आज तुम्ही जेव्हा जुन्या मराठी सिनेमातील तमाशातील लावण्या पहाता तेव्हा त्यातील लावणी सादर करणारी अभिनेत्री तिचे लटके झटके आणि तिच्या पाठीमागे असलेला गणपत पाटील आणि त्याच्या भावमुद्रा तुम्हाला खिळवून टाकतात.

'बाई मी पतंग उडवीत होते' या लावणीत जितकी आपल्याला जयश्री गडकर आठवते तितकाच आठवतो त्यात गणपत पाटील यांनी उभा केलेला नाच्या! आपल्या टिपिकल 'बायकी' चिरक्या आवाजात ओरडत बोलताना उजव्या हाताची तर्जनी हनुवटीवर आपटीत आणि डावा हात कमरेवर ठेवून बोलताना अंगाला लचके, झटके देत 'आता गं बया' असं म्हणणारी गणपत पाटलांची भूमिका मराठी सिनेमांमध्ये बेहद लोकप्रिय ठरली.

सत्तरच्या दशकात गणपत पाटील मराठी सिनेमातील हुकुमाचा एक्का होता. या काळात आलेल्या सर्व तमाशापटात ते आवर्जून दिसायचे. १९६५मध्ये आलेल्या 'केला इशारा जाता जाता' या चित्रपटाने त्यांच्या इमेजला प्रचंड लोकप्रियता मिळाली.

२०१० साली रवी जाधव यांचा 'नटरंग' चित्रपट प्रदर्शित झाला. यात थोड्या फार प्रमाणात हीच समस्या दाखवली होती, २३ मार्च २००८ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. **-धनंजय कुलकर्णी**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चपळता वाढवणारे व्यायाम प्रत्येकासाठी का महत्त्वाचे?

साधारणपणे आपण आपल्या व्यायामात कार्डियो (हृदयाची क्षमता वाढवणारे व्यायाम), स्ट्रेन्थ ट्रेनिंग (स्नायूंची शक्ती वाढवणारे व्यायाम) आणि फ्लेक्सिबिलिटी (शरीराची लवचिकता वाढवणारे व्यायाम) यांचा समावेश करतो, पण व्यायामाच्या रुटीनमध्ये अजून एक व्यायाम प्रकार समाविष्ट करायलाच हवा तो म्हणजे अजिलिटी-चपळता वाढवणारे व्यायाम!



या व्यायामांमुळे हालचालीचा वेग सुधारतो, शिवाय हालचाल करताना पटकन दिशा बदलण्याची क्षमता वाढते, पायऱ्या चढताना उतरताना कुणी मध्ये आलं तर तुम्ही न थांबता बाजूने जाता, रस्त्याने चालताना कुणी एकदम मध्ये आलं तर तुम्हाला पटकन थांबता येतं किंवा बाजूने चालत जाता येतं, झटकन वळता येतं आता हे ऐकल्यावर असा वाटेल की हे तर आम्हाला आतासुद्धा करता येतं त्यासाठी व्यायामाची काय गरज? पण असं पटकन थांबता येणं, दिशा बदलणं यासाठी तुमच्या स्नायू आणि शरीरावर येणारा ताण हा समान प्रमाणात विभागला जाणं आवश्यक असतं. लहान वयात शरीर हे स्वतःहून करीत असतं, पण जसजसं वय वाढतं तसं ही क्षमता कमी होत जाते. मग पटकन थांबायला किंवा दिशा बदलायला, वळायला जमतं, पण नंतर स्नायू आणि लिगामेंट्स दुखवतात. हे टाळण्यासाठी अजिलिटी व्यायामाची गरज असते.

या व्यायाम प्रकारांमुळे स्नायूंमधील सगळे फायबर्स एकत्रितपणे आणि अचूक काम करतात. त्यामुळे कुठलीही हालचाल अधिक प्रभावी होते आणि स्थिरता वाढते. दिशा बदलण्याच्या व्यायामांमुळे मेंदूच तोल सांभाळणारा भाग उत्तेजित होतो. त्यामुळे पडण्याची भीती आणि शक्यता दोन्ही कमी होते.

वेगवेगळ्या वातावरणात शरीराच्या विविध हालचाली नियंत्रित करणे, तोल सांभाळणे यात शारीरिक घटक तर कार्यान्वित होतातच, पण त्यासोबत संज्ञानात्मक कार्येदेखील समाविष्ट होतात, ज्यामध्ये व्हिज्युअल प्रोसेसिंग, वेळ, समज आणि त्वरित निर्णय घेण्याची क्षमता यांचा समावेश होतो. यामुळे शरीर आणि मन यांचं संतुलन राखण्यास मदत होते.

अजिलिटी व्यायाम फक्त खेळांडूपूरते मर्यादित नसून कुठल्याही वयाच्या व्यक्तींमध्ये समाविष्ट करता येतात. हे व्यायाम स्वतःच्या मनाने करू नका. फिजिओथेरपिस्ट किंवा स्ट्रेन्थ आणि अजिलिटी तज्ज्ञ यांच्याकडून शिकून घ्या. तुमच्या वयानुसार, शारीरिक परिस्थितीनुसार, गरजेनुसार हे व्यायाम तुमच्या रुटीनमध्ये समाविष्ट करू शकता.

# सावित्री, गांधारी, काळ नद्यांच्या स्वच्छतेला हिरवा कंदील

**महाड : प्रतिनिधी**

महाड परिसरातील सावित्री, गांधारी आणि काळ या प्रमुख नद्यांच्या पात्रातील गाळ काढण्याच्या कामातील अडसर अखेर दूर झाला असून, आगामी आठ दिवसांत प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात होणार आहे. यामुळे पूरस्थिती नियंत्रणात ठेवण्यास मदत होण्याबरोबरच जलसाठा वाढण्यासही मोठा हातभार लागणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



सन 2021 मध्ये महाडमध्ये आलेल्या महाप्रलयानंतर शासनाने युद्धपातळीवर उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला होता. त्या पार्श्वभूमीवर नदीपात्रातील गाळ काढणे, नद्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, तसेच छोट्या ओढे व नाल्यांची स्वच्छता या कामांना प्राधान्य देण्यात आले. गेल्या चार वर्षांत या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम महाडकरांनी अनुभवले असून, पावसाळ्यातील पाण्याचा निचरा सुलभ होण्यास मदत झाली आहे.

सावित्री, गांधारी आणि काळ नदींसह परिसरातील लहान ओढे व नाल्यांमधील गाळ काढण्याची कामे टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली होती. या कामांमुळे नदीपात्र अधिक खोल व रुंद होत असून, पावसाचे पाणी साठवण्याची क्षमता वाढत आहे. परिणामी, पूराचा धोका कमी होण्यास आणि भूजलपातळी सुधारण्यास मदत होत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, चालू वर्षासाठी सुमारे 20 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, हा निधी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या विशेष प्रयत्नातून उपलब्ध झाला आहे. या निधीतून नदी स्वच्छता व गाळ काढण्याची कामे अधिक गतीने आणि व्यापक स्तरावर राबवली जाणार आहेत.स्थानिक प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज ठेवली असून, येत्या आठ दिवसांत प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार आहे. या निर्णयामुळे महाड परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, भविष्यातील पूरस्थिती टाळण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

चालू वर्षी यासंदर्भात प्राप्त झालेल्या पाटबंधारे विभागाच्या यंत्रणेकडून माहिती नुसार 70 पेक्षा जास्त जागांची निवड विभागाकडून करण्यात आली असून सुमारे 90 लाख क्युबिक मीटर गाळ काढण्याचा उद्दिष्ट चालू वर्षी ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

जलव्यवस्थापन अधिक सक्षम होणे गरजेचेमागील तीन वर्षात झालेल्या कामाचा दृश्य परिणाम आडकर नागरिकांनी या दरम्यान झालेल्या मुसळधार पर्जन्यवृष्टीनंतर अनुभवला होता यामुळेच आगामी किमान पाच वर्षे सलग या तीनही नदीपात्रातील गाळ बाणकोट खाडीपर्यंत काढला गेल्यास आगामी 25 वर्षात महाड व परिसरातील नागरिकांना महाप्रलयाचा त्रास होणार नसल्याने शासनाकडून उशिरा का होईना मंजूर झालेल्या या कामाचे परिसरातील ग्रामस्थ व व्यापारी वर्गातून स्वागत होत आहे.

2021 च्या महाप्रलयानंतर महाडकर नागरिकांनी स्थापन केलेल्या पूर निवारण समितीने यासंदर्भात आपला सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवल्या असल्याचेच या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे शासकीय यंत्रणांच्या संदर्भातील असलेल्या कागदोपत्री विषयांच्या पूर्ततेकडे व नागरिकांच्या गरजा योग्य व्यासपीठावर मांडून महाडकरांची पुढील तीन दशकांची असलेली काळजी या निमित्ताने घेतले गेल्याचे दिसते

# फलाटाची लांबी कमी असल्याने रेल्वे प्रवाशांची उडतेय तारांबळ

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबत असल्यामुळे प्रवाशांचे हाल होतात. कधी सामान फलाटावर राहते तर कधी प्रवासी घाईत गाडी पकडताना पडून अपघात होऊ शकतो. ही गैरसोय डिसेंबर २०२६नंतर होणार नाही, कारण कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी वाढविण्याचे काम डिसेंबर २०२६पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे रेल्वे प्रशासनाने सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांना लेखी कळविण्यात आहे.

कर्जत रेल्वेस्थानकावर एकूण तीन फलाट व एक इएमयु फलाट आहे. फलाट क्रमांक एक वर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या येत असतात. परंतु या फलाटाची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे खूप धावपळ व हाल होतात. या गडबडीत अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकतेच कर्जत रेल्वेस्थानकावर डब्याची स्थिती दर्शविणारे छोटे इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. दोन वेळा गाडी थांबत असल्याने रेल्वे प्रशासनाला एकाचं ठिकाणी डबे दर्शविणारे दोन इंडिकेटर्स बसवावे लागले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो व कधी कधी गाडी चुकते तर कधी सामान फलाटावर राहते. गाडी पकडण्याच्या नादात फलाटावर प्रवासी पडत सुद्धा आहेत.

लांब पल्ल्याच्या जास्त डब्यांच्या गाड्या कर्जत रेल्वे स्थानकातील एक नंबर फलाटावर दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवाशांची धावपळ होत असे. या बाबत पंकज ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता फलाटाची लांबी वाढविण्यात येणार असून हे काम फेब्रुवारी २०२६ पूर्ण होणार असल्याचे कळविले होते. परंतु सदर काम वेळेत न झाल्यामुळे ओसवाल यांनी पुन्हा रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने 'नॉन-इंटरलॉकिंगचे काम पूर्ण झाल्यावर कर्जत प्लॅटफॉर्मचा सीएसएमटी टोकाकडील विस्तार करण्यात येईल. यासाठी रेल्वे आयुक्तांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख डिसेंबर २०२६ आहे.' असे ओसवाल यांना कळविले आहे.

# शाश्वत शेतीमध्ये यांत्रिकीकरण अनिवार्य -डॉ.पी.यू. शहारे

**कर्जत : प्रतिनिधी**

'भात शेतीतील लावणीपासून कापणीपर्यंत लागणाऱ्या विविध यंत्रांची सविस्तर माहिती देत, कमी खर्चात, कमी कष्टात आणि अधिक उत्पादन देणारी शेती करण्यासाठी यांत्रिकीकरणाचे महत्व आहे. एक एकर भात लावण्यासाठी सुमारे सव्वा लाख वेळा वाकावे लागते, तर एक हेक्टर क्षेत्र नांगरण्यासाठी बैलाच्या सहाय्याने सुमारे ६४ किलोमीटर चालावे लागते. त्यामुळे भातशेतीतील श्रम कमी करण्यासाठी आधुनिक यंत्रांचा वापर काळाची गरज आहे. शेती साठी मजुरांची वाढलेली कमतरता आणि वाढती मजुरी लक्षात घेता शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरणाची कास धरणे अत्यावश्यक आहे. असे स्पष्ट प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. यू. शहारे यांनी केले.



कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री सभागृहात आदिवासी उप योजना आणि अखिल भारतीय समन्वित बियाणे (पिके) योजनेअंतर्गत आयोजित भात पीक बीजोत्पादन प्रशिक्षण आयोजित केले होते. याप्रसंगी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. यू. शहारे तसेच सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने आणि तालुका कृषी अधिकारी आर. ए. शिंदे उपस्थित होते. या भात बिजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान आदिवासी उप योजनेअंतर्गत शिलारवाडी, खरबाची वाडी, खोंडेवाडी आणि नागेवाडी येथील पाच शेतकरी गटांना मनुष्यचलित भात लावणी यंत्र, नॅपसॅक स्प्रे पंप वितरित करण्यात आले. तसेच ५० शेतकऱ्यांना युरिया ब्रिकेट्स, वैभव विळे, पॉकेट डायरी आणि घडीपत्रिकांचे वाटप करण्यात आले. या साहित्याचे वितरण डॉ. शहारे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रास्ताविक डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. कर्जत भात संशोधन केंद्राचे सहयोगी शास्त्रज्ञ डॉ. भरत वाघमोडे यांनी जमिनीच्या प्रकारानुसार योग्य भात जातींची निवड कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच पोषणमूल्यांनी समृद्ध, भाकरी, पोहे, मुरमुरे आणि दैनंदिन आहारासाठी उपयुक्त विविध गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जातींचा वापर करण्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. शेतकऱ्यांनी संशोधन केंद्राला भेट देऊन नवीन तंत्रज्ञान आत्मसात केल्यास त्यांच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल.' असेही त्यांनी सांगितले.

तालुका कृी अधिकारी आर. ए. शिंदे यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती देत शेतकरी गट नोंदणीची प्रक्रिया आणि त्याचे फायदे समजावून सांगितले.

# बाळसई येथे आज आई बेलजाई मातेचा पालखी सोहळा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळच असलेल्या बाळसई या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बाळसुई गावची नवसाला पावणारी श्री आई बेलजाई मातेचा पालखी सोहळा सोमवार दि. 23 मार्च 2026 रोजी मोठ्या उत्साहात व विविंध धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सोमवारी सकाळी 8 वाजता सर्व बाळसई ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये मुर्तीवर दुग्ध अभिषेक व होमहवन करुन होणार आहे त्यानंतर दुपारी उपस्थित भाविकांना महाप्रसाद देण्यात आल्यानंतर सायंकाळी 4 वाजता संपूर्ण बाळसई गावातुन पालखीतून श्री. बेलजाई मातेच्या पादुका दर्शन मिरवणूक सोहळा पार पडेल.

पालखी सोहळा मंदिरात सायंकाळी 7 वाजता वारकरी भजन मंडळ, महिला मंडळ बाळसई यांचा हरिपाठ होईल. तद्नंतर या भव्यदिव्य अशा पालखी सोहळ्यासाठी उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसाद दिल्यावर रात्री ग्रामस्थ व वारकरी भजन मंडळ बाळसई यांचा जागरणाचा कार्यक्रम होईल.



# माणगावमध्ये जलवाहिनीला गळती, लाखो लिटर पाणी वाया

**माणगाव : बातमीदार**

माणगांव नगरपंचायत उतेखोल गावातील कालव्यावरील जुन्या कार्यरत योजनेतील मुख्य पाणीपुरवठा करणाऱ्या बिडाच्या (250एमएम) 12 इंची लाईनवर मोठा लिकेज झाल्याने लाखो लिटर पाणी या ठिकाणी कालव्याचे ओहळातुन वाहुन वाया जात होते. या भागातील झाडाझुडपात हे पाणी वाया जाताना कोणाच्याही लक्षात येत नव्हते.

परिणामी पाणीपुरवठा कमीदाबाने होत असल्याचे देखील लक्षात आले नव्हते. येथील स्थानिक नागरिकाचे घरामागील बाजुस ही बाब त्यांचे निदर्शनास आल्याने त्यानी पाणी पुरवठा सभापती अजित तार्लेकर याना मेसेजद्वारे कळविली असता माहीती समजताच त्यानी तातडीने दखल घेतली आहे.

सभापतींनी नगरपंचायत पाणी पुरवठा कर्मचारी दिनेश मढवी यांच्यासह रविवार दि.22 मार्च रोजी भर दुपारी 2 वाजता याठिकाणी वाढलेल्या झाडाझुडपातुन वाट काढत प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य नियोजन करून पुढील काही तासांसाठी पाणीपुरवठा खंडित करून युध्द पातळीवर या मुख्य लाईनचे दुरुस्तीचे काम सुरु केले.



मोठी लाईन व मोठा लिकेज अडचणीचे ठिकाणी असल्याने तो काढण्यासाठी नगरपंचायतीचे पाणीपुरवठा कर्मचारी दिनेश मढवी, चंद्रकांत सोंडकर, विलास काळे, अविनाश पाटील, चंद्रकांत चव्हाण, सुनिल तार्लेकर, अमोल बुटे यांनी पाणी पुरवठा सभापती अजित तार्लेकर यांचे मार्गदर्शनात जवळपास सहा तास अथक मेहनतीने दुरुस्तीचे जिकरीचे काम तातडीने पूर्ण केल्याने नगरपंचायतीच्या लाखो लिटर वाया जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गळती थांबविण्यात यश आले, परिणामी शहराचा पाणीपुरवठा योग्य दाबाने पूर्ववत झाला आहे.


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that, I am investigating the right, title and interest of **M/s. ASTELL APEX DEVELOPERS LLP,** having its registered office at 265, Satra Plaza, Palm Beach Road, Plot No. 19 & 20, Sector – 19/D, VashiNavi Mumbai – 400703, to the property more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the **"said Property"**).

All person/s having any claim in respect of thesaid Property or any part thereof by way of sale, exchange, gift, mortgage, security (collateral or otherwise), charge, lien, lease, tenancy, kul, trust, maintenance, inheritance, possession, license, succession, contract, memorandum of understanding, power of attorney, easement, right of way, occupation, family arrangement, settlement, award or decree of any court of law, lis-pendens, attachment, reservation, development right, FSI consumption, partnership, joint venture, joint development, development management or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing alongwith supporting documents to the undersigned at Off. No. 48, Krishna Apartment, Jai Ganeshji CHSL, Plot No.34, Sector 36, Kamothe, Navi Mumbai 410209 and email at nvdhongadi@gmail.com to the undersigned within 7 (seven) days from the date of publication hereof, failing which, it shall be treated that no claims exist in respect of the said Property, and if any, the same shall be deemed to have been waived and/or abandoned and certified accordingly.

**SCHEDULE**

All that piece and parcel of leasehold Plot No. 78A, admeasuring 949.86 sq. meters situated at Sector 52, Dronagiri Node, TalukaUran, District Raigad 400061, within the limits of Sub Registrar of Uran and bounded as follows:

On or towards the North by : by Plot No.74B, 74C & 77B
On or towards the South by : by Proposed 22.00 Mtrs. Wide Road
On or towards the East by : by Plot No.78
On or towards the West by : by Plot No.79

Dated this 22thday of March, 2026

*sd/-*
***Navin V. Dhongadi***
***Advocate***


# चुलीवरच्या चायनीजचा मेढेखारमध्ये प्रयोग

**पाली : प्रतिनिधी**

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे देशात गॅस टंचाई निर्माण झाली आहे. हॉटेल व्यावसायिकांवर गॅसच्या वापरावर निर्बंध लागू करण्यात आले आहे. परिणामी, अनेक हॉटेल व्यवसायिकांवर हॉटेल बंद ठेवण्याची वेळ ओढावली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. तसेच शासनाकडून हॉटेल व्यावसायिकांच्या गॅस वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. गेले दोन आठवडे ही परिस्थिती जैसे थे असल्यामुळे आता, हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेल बंद ठेवण्याची वेळ ओढावली आहे.



या परिस्थितीवर मेढेखार च्या चायनीज सेंटरचे मालक, मराठी उद्योजक दाम्पत्याने चुलीचा पर्याय उभा केला आहे. मंगेश म्हात्रे या मराठी माणसाने चायनीज व्यवसायात चव, दर्जा व क्वान्टिटी यामुळे आपला व्यवसायिक प्रभाव टिकवून ठेवला आहे. येथील चायनीज पदार्थांना लाकूड आणि सरपणाच्या आचेवर शिजवल्यामुळे एक नैसर्गिक' खमंग चव येते आहे . आजपर्यंत झणझणीत चवीचे गावरान चिकन/मटण खवय्याना उपलब्ध करून दिल्याचे ऐकीवात होते. मात्र मंगेश म्हात्रे यांच्या ३ M चायनीज सेंटरवर पेटती चूल ग्राहकांना आकर्षित करीत आहे.

चुलीच्या मंद आचेवर चायनीज शिजल्यामुळे मसाल्यांचा स्वाद त्यात उतरुण अन्नाची पौष्टिकता टिकून राहत आहे. गावाकडील वातावरणात असलेले मेढेखार चे चायनीज सेंटर सध्या भारीच चर्चेत आहे. पोयनाड नागोठणे मार्गालगत मेढेखार च्या शेतात मोकळ्या हवेशीर जागी चुलीवरचे जेवणाचा स्वाद घेण्याचा एक आनंददायी अनुभव सर्वांनाच मेजवानी ठरतोय . येथील चुलीवरचे चायनीज चाखण्यासाठी दुरवरून ग्राहक येत आहेत. मंगेश म्हात्रे म्हणाले की माझे चायनीज लोकांना नेहमीच आवडते,

मात्र आज गॅस टंचाईत चुलीवरचे चायनीज देण्याचा विचार केला. जेव्हापासून चुलीवरचे खमंग पदार्थ लोकांना मिळायला लागले तेव्हापासून ते चुलीवरच चायनीज हव असल्याचा आग्रह धरीत आहेत. त्यांना चुलीवरची चव आवडू लागली आहे. घरी जाऊन कॉल करून चायनीज च्या चवीची वाहवा करीत आहेत. चुलीवर ऑर्डर मारण्याचा मी प्रयत्न केला. व त्यात मला यश मिळाले. निसर्ग रम्य ठिकाणी आमचं चायनीज सेंटर आहे. आमच्या कडे कोणताही कुक नाही. नेपाळचे कुक आणून त्यांच्याकडून चायनीज देण्यापेक्षा आपण लोकांना चांगल आणि वेगळी चव देण्याचा प्रयत्न करतोय.विशेष म्हणजे या चायनीज सेंटरवर कुटुंबातील मराठी माणस मेहनत करतात. आम्ही मराठी माणसांना एक संदेश देणे पसंत करतो की व्यवसायात उतरून मेहमत व सातत्य ठेवलं तर यश नक्की मिळत.

शहाबाज येथील मानस या तरुणाने सांगितलं की इथल्या चुलीवरच्या चायनीज ची बातच न्यारी आहे. एक वेगळी खमंग 'चव इथं दिली जाते. स्वच्छता आणि निसर्गरम्य परिसर यामुळे येथे येणं म्हणजे एक पर्वणी वाटते. चायनीजची मोठी क्रेझ निर्माण झाली असून मंगेश म्हात्रे या मराठी माणसाने गॅस टंचाईला चुलीचा पर्याय उभा केला आहे.

# पनवेल रेल्वे स्टेशनजवळील सर्कलचा घेर कमी करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्टेशनजवळ होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे येथील मोठ्या सर्कलचा घेर कमी करण्याची मागणी प्रवासी तसेच नागरिक करत आहेत. या सर्कलचा घेर कमी केल्यास होणारी वाहतूक कोंडी कमी होईल.

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात वाहतूक कोंडी नेहमीची झाली आहे. मोठ्या प्रमाणावर रिक्षा या ठिकाणी असल्याने रिक्षांची गर्दी होते. कशाही पद्धतीने आणि कुठेही रिक्षा पार्क करत असल्याने प्रवाशांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. याशिवाय त्या ठिकाणी असलेल्या सर्कलजवळ बेकायदेशीर रित्या टॅक्सी परमिटच्या चार चाकी गाड्या लागतात अधिकृत थांबा नसताना देखील चार चाकी वाहनांची



गर्दी होत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडते. पनवेल रेल्वे स्थानकातून दररोज लाखोच्या संख्येने प्रवासी कामानिमित्त ये जा करत असतात. त्यामुळे रेल्वे स्टेशन परिसरात नेहमीच वर्दळ सुरू असते, मात्र बऱ्याचदा अनेकांना येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीत जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. रिक्षाचालकांसोबत अनेकदा बाचाबाचीदेखील होतात काही वेळेला प्रवासी भाड्यावरून वाद होतात. वर्दी नसणे, रिक्षा चालवण्याचा परवाना, रीक्षेची कागदपत्रे तसेच रिक्षा नूतनीकरण नसतानादेखील काही रिक्षा चालक या ठिकाणी व्यवसाय करतात. आरटीओ तसेच पनवेल वाहतूक विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

पनवेल रेल्वे स्थानकासमोर भले मोठे सर्कल बांधण्यात आलेले आहे. या सर्कलचा घेर कमी केल्यास साहजिकच या जागेचा वापर अधिक करता येईल. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. यात सर्कलला लागून चार चाकी टी परमिटच्या गाड्या बेकायदेशीर रित्या उभ्या असतात. येथे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी कायमस्वरूपी एक वाहतूक पोलीस रेल्वे स्टेशन जवळ नेमावा, अशी मागणी प्रवासी करत आहेत.

# उरण बोरी येथे नागरी संरक्षण दलाचे पाठ्यक्रम शिबिर



**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील बोरी येथे महाराष्ट्र शासन गृह विभाग विशेष नागरिक संरक्षण दल उरण रायगड यांच्यामार्फत नागरिक संरक्षण प्राथमिक पाठ्यक्रम शिबिर झाले.

यात प्रथमोपचाराची तत्वे आणि पायऱ्या, हवाई हल्ला सूचना प्रणाली, नागरी संरक्षण सेवा, संघटना, आग आणि आगीची तत्वे, दोर व गाठींचे प्रकार, आपत्कालीन विमोचन पद्धती, बँडेजचे प्रकार तसेच बँडेज बांधण्याच्या पद्धती, श्वासावरोध व कृत्रिम श्वसन पद्धती, पाण्यात बुडलेल्या व्यक्तीला धुराच्या खोलीतून बाहेर काढलेल्या व्यक्तीला तसेच इलेक्ट्रिक शॉक लागलेल्या बेशुद्ध व्यक्तीला शुद्धीवर आणण्याचा पद्धती, माणूस बेशुद्ध झाल्यावर, मानसिक ताण तणाव, शारीरिक ताण तणाव येऊ नये म्हणून काय करायला हवे, हृदयविकार आल्यास त्याला कोणत्या पद्धतीने शुद्धीवर आणायचा इत्यादी यापद्धती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षण आयोजन करण्याकरता हरेश्वर ठाकूर विभागीय क्षेत्ररक्षक यांनी मेहनत घेतली. शशिकांत शिरसाट सर सहाय्यक उपनियंत्रक नागरी संरक्षण दल उरण, दौलत पाटील सक्रिय स्वयंसेवक यांनी या प्रशिक्षण शिबिरात स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले, दत्ताराम गोंधळी उपमुख्य क्षेत्ररक्षक, समीर थळी, नितेश घरत, भूमी मोकल, उत्कर्षा गावंड, रेशम कोळी, कांशिता म्हात्रे, आयुष मोहिते, शुभम वीर, गौरव डांगे, मनाली पाटील, भाविक पाटील, प्रतीक तांडेल, यशश्री राव, मानसी वर्तक, वैष्णवी वर्तक, समीक्षा ठाकूर तसेच पेण तालुक्यातील राजेश म्हात्रे आदींनी मार्गदर्शन करून नागरी संरक्षण दलातील कर्तव्य व जबाबदारी याबाबत माहिती करून दिली.

# सुपर स्वच्छ लीगमध्ये नवी मुंबईचा समावेश



**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहराच्या 'सुपर स्वच्छ लीग'मध्ये नवी मुंबईचा समावेश असून 'स्वच्छ सर्वेक्षण' अंतर्गत 'स्वच्छ शहर जोडी' संकल्पनेमध्ये 'मार्गदर्शक शहर' म्हणून नवी मुंबईकडे कन्नड, जिंतूर, केज या ३ नगरपंचायती आणि लोणार व मलकापूर या दोन नगर परिषदांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, 'स्वच्छ शहर जोडी' उपक्रमाचे नोडल अधिकारी म्हणून अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छता अधिकारी यांच्या समुह गटाने नुकतीच या पाचही शहरांना भेटी देत पाहणी केली व स्वच्छता विषयक सुधारणांसाठी मौलिक सूचना केल्या.

या वर्षीपासून 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने 'स्वच्छ शहर जोडी' उपक्रमांतर्गत देशातील १९६ शहरांना मार्गदर्शन करण्यासाठी एकूण ७२ मार्गदर्शक शहरांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये 'सुपर स्वच्छ लीग' मध्ये समाविष्ट नवी मुंबई महानगरपालिका शहरास ३ नगरपंचायती व २ नगर परिषदा यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

स्वच्छ शहर जोडीमध्ये स्वच्छतेच्या उत्तम पातळीवर असलेल्या शहराचे मागदर्शन स्वच्छतेबाबत सुधारणेसाठी प्रयत्नशील असणाऱ्या शहरांना मिळावे ही भूमिका असून घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता व्यवस्थापनातील उत्तम पद्धती, सार्वजनिक स्वच्छता व नागरिक सहभाग अशा सर्वच बाबतीत विचारांचे आदान–प्रदान अपेक्षित आहे.

नवी मुंबई महानगरपालिका देशातील सर्वात स्वच्छ शहरांपैकी एक असून त्यांचे मार्गदर्शन केंद्र सरकारने ठरविलेल्या महाराष्ट्रातील इतर पाच शहरांना मिळावे व या माध्यमातून त्यांच्या शहरातील स्वच्छतेला अधिक गुणवत्ता लाभावी या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा असल्याचे लक्षात घेत नवी मुंबई महानगरपालिकेने याबाबत पुढाकार घेतला आहे.


या पथकांनी त्या ५ शहरांमध्ये जाऊन तेथील स्वच्छता व्यवस्थापनाची पाहणी केली. त्याठिकाणी असलेली कचरा वर्गीकरणाची पध्दत, कचरा संकलनाची पध्दत, कचरा विल्हेवाटीची व्यवस्था, सार्वजनिक शौचालय व्यवस्था, जलस्त्रोत स्वच्छता अशा विविध बाबींची पाहणी करुन त्यामध्ये सुधारणा सुचविल्या. त्याचप्रमाणे माहिती प्रचार व प्रसिध्दी बाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध माध्यमांचा प्रभावी वापर करणेबाबत सूचना केल्या. स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत सिटी प्रोफाईलमध्ये दाखल करावयाच्या ऑनलाईन माहितीच्या पध्दतीचीही सविस्तर माहिती देण्यात आली व त्याविषयीच्या शंकांचे समाधानही करण्यात आले.

या पाहणीमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांसोबत क्षेत्रभेटी दिल्या व स्वच्छता कार्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधतानाच तेथील नागरिकांशीही सुसंवाद साधून स्वच्छतेची स्थिती जाणून घेतली. स्वच्छता ही दररोज करण्याची गोष्ट असल्याने व त्यात नागरिक सहभाग अत्यंत महत्वाचा असल्याने त्यावर जास्तीत जास्त भर दयावा व त्यासाठी लोकसहभागातून नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबवावेत असे सूचित करण्यात आले.

स्वच्छ शहर जोडीमधील पाचही शहरांतील अभ्यासगटाने नवी मुंबई महानगरपालिकेस भेट देऊन येथील घनकचरा व्यवस्थापन प्रणालीतील विविध बाबींची पाहणी करावी व तशा प्रकारचे अनुकरण करावे असे आवाहन त्यांना करण्यात आले.

स्वच्छ शहर जोडी उपक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेकडे जबाबदारी देण्यात आलेल्या पाचही शहरांच्या स्वच्छतेमधील प्रगतीसाठी नवी मुंबई महानगरपालिका मार्गदर्शक शहर म्हणून कटीबध्द असून या माध्यमातून देशातील शहरांमध्ये आमुलाग्र स्वच्छता बदल व्हावा या संकल्पनेला मजबूत आधार दिला जात आहे.

# कोप्रोली येथे श्री साई चरित्र पारायण आणि पूजा उत्साहात



**उरण : बातमीदार**

सालाबाद प्रमाणे ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली (उरण) यांच्या सौजन्याने गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही गुढीपाडव्याचे औचित्य साधून बुधवार व गुरुवार श्री साईबाबांचे साई चरित्र पारायण व श्री सत्यनारायणाचे महापूजा व साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवार व गुरुवारी दररोज काकड आरती, बाबाचे मंगल स्नान, श्री साई चरित्र पारायण, मध्यान्ह आरती, हरिपाठ, साईबाबांचे धुपारती असे विविध धार्मिक उपक्रम मोठया उत्साहात झाले. रात्री ९ वाजता श्री बापूजी देव कला मंच व अर्णवी आर्ट कोप्रोली उरण प्रस्तुत साई गीत, लोकगीत, कोळीगीतांचा मराठी नजराणा कार्यक्रम सादर करण्यात आले. आलेल्या प्रत्येक प्रमुख पाहुण्यांचे तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

उरण तालुक्यातील कोप्रोली गावातील गणेश मंदिर येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला जनतेचा भाविक भक्तांचा उत्तम प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली व साई सेवक, ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ उरण व साई सेवक, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, सर्व महिला बचत गट, माऊली हरिपाठ मंडळ, सर्व क्रिकेट क्लब, बापूजी देव कला मंच, अर्णवी आर्ट, थ्री व फोर व्हीलर रिक्षा चालक–मालक संघटना कोप्रोली, ग्रामस्थ मंडळ कोप्रोली आदी विविध संस्था, संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. सर्वच कार्यक्रमाचे सुंदर, उत्तम असे नियोजन व आयोजन केल्याने सर्वांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

# नववर्षानिमित्त पालवी विशेषांकाचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संस्कार भारती कोकण प्रांताचा 'पालवी' हा गुढीपाडवा विशेषांक हिंदू नववर्षानिमित्त विशेषांकाची संस्कृती रुजवत आहे. यावर्षीचा वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण असा चौथा विशेषांक प्रकाशित करण्यात आला. गोरेगाव, मुलुंड, पनवेल, डोंबिवली इत्यादी ठिकाणी गुढीपाडव्या दिवशी शोभायात्रांमध्ये पालवी अंकाचे प्रकाशन विविध पद्धतीने मोठ्या उत्साहात करण्यात आले.

डोंबिवलीत श्री गणरायाच्या पालखीत अंक अर्पण करण्यात आला तर गोरेगाव येथे मंत्रोच्चाराद्वारे अंकाचे प्रकाशन करण्यात आले. कोकण प्रांतात विविध ठिकाणी शोभायात्रांमध्ये अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

कलाविष्काराचे नवे आयाम या विषयांमध्ये दीपक पळसुले, निकिता भागवत, तपस्या नेवे यांनी विचार मांडले असून काळा घोडा या कला या विषयाला वाहिलेल्या उत्सवाबाबत वर्षा कारळे यांनी लिहिले आहे. भरतमुनी आणि लोककला या विषयावर डॉक्टर समीरा गुजर जोशी यांचे अभ्यासपूर्ण विचार मंथन अंकामध्ये समाविष्ट असून संघ कार्यकर्ते आणि कला हा विषय संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त मांडण्यात आला आहे.

मराठी शाळा बंद पडण्याच्या उंबरठ्यावर असतानाच शुभदा चौकर मानसी वैशंपायन शुभदा रामसिंग या मान्यवरांचे विचारमंथन निश्चितच दिशा देणारे आहेत. क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम चे लेखक दिग्दर्शक हेमंत ढोमे यांची डॉ. स्मिता दातार यांनी घेतलेली मुलाखत हे अंकाचे वैशिष्ट्य आहे तर हिंद दी चादर च्या निमित्त रामेश्वर नाईक यांचा लेख सुद्धा साहित्यिक दर्जा वाढवणारा आहे. याशिवाय एक होती हिडिंबा, राजू भाई बी ए एम एस, सुरक्षित रस्ते वाहतूक या पुस्तकांचे परीक्षण, कुटुंब या विषयाला वाहिलेल्या कथा, कविता, एक के मराठी यांचे शब्द काव्य यांनी अंक सजला आहे.

वीणा सामंत, अपर्णा कुलकर्णी नाडगोंडी, संकेत शिंगोटे असे संपादक मंडळ असून ज्ञानेश्वर जाधव यांचे विषयाला अर्थपूर्ण आणि खास शैलीतील मुखपृष्ठ लक्षवेधक ठरले आहे.

# उरणमध्ये मराठी नववर्षानिमित्त विविध कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक अणि सकल हिंदू समाज यांच्या वतीने उरण शहरात गुढीपाडवा भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. उरण जेष्ठ नागरिक मंडळ यांनी सकाळी मोठ्या उत्साहात शोभायात्रा काढली होती. सर्वांनी एकमेकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

सायंकाळी सकल हिंदू समाज व उरण जेष्ठ नागरिक मंडळ भव्य शोभायात्रा काढण्यात आली. महिलांची बाईक रॅलीही काढण्यात आली. शोभायात्रेस उरण नगर परिषद नानासाहेब धर्माधिकारी शाळा पेन्शनर पार्क येथून सुरुवात झाली पुढे स्वामी विवेकानंद चौक, गणपती चौक, विमला तलाव, पुढे उरण नगर परिषद नानासाहेब धर्माधिकारी शाळा पेन्शनर पार्क येथे समारोप करण्यात आला. या शोभायात्रेत धार्मिक संस्था, सामाजिक संस्था यांचा सहभाग होता.



# कोकण मराठी साहित्य परिषदचे कार्य प्रेरणादायी -साहित्यिक प्रदीप ढवळ

**उरण : प्रतिनिधी**

कोमसापचे साहित्यातील कार्य प्रेरणादायी असेच आहे, असे प्रतिपादन कोमसापाचे कार्याध्यक्ष प्रदीप ढवळ यांनी केले. कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरणच्या वतीने पाले येथील रामचंद्र म्हात्रे फार्महाऊसवर नुकतीच १२५ वे. मधुबन कट्टा महाकाव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी साहित्यिक प्रदीप ढवळ हे आपल्या भाषणात बोलत होते.

या संमेलनाचे अध्यक्षस्थान साहित्यरत्न प्रा. एल.बी. पाटील यांनी भूषविले होते. यापुढे ढवळ यांनी कोमसापाची साहित्य सेवा हि एल बी पाटील यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रभावीपणे सुरू आहे. त्यामुळे येथील साहित्य जपले जात असून त्यातून समाज प्रबोधन होत असल्याची भावना ढवळ यांनी व्यक्त केली.

संमेलनात रामचंद्र म्हात्रे यांच्या गंध मातीचा व ना.ग. पाटील यांच्या आनंदाचे डोहो, मोगऱ्याचा गंध या पुस्तकांचे प्रकाशन



करण्यात आले. कोमसापचे अध्यक्ष तर मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्याध्यक्षा रंजना केणी, समता ठाकूर, संजीव पाटील यांच्या सूत्रसंचालनातून कवी रसिकांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साहित्य क्षेत्रातील जयू भाटकर, संजय गुंजाळ,उज्वला दिघे, ज्योती राजपूत, संध्या दिवकर, गोपाळ शेळके, उज्वला दिघे, अक्षता गोसावी, संजना जवाटकर यांच्यासह अन्य साहित्यिक मान्यवर उपस्थित होते.

या निमित्ताने विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या योगेश म्हात्रे, वसंत चिर्लेकर, सदाशिव पाटील, कीर्ती भगत, राजेंद्र पाटील, धीरेंद्र ठाकूर, चांगदेव पाटील, प्रशांत म्हात्रे, मयंक म्हात्रे, सत्यवान म्हात्रे, हितेश मढवी, प्रा. ए.डी. पाटील, अजय शिवकर, लवेंद्र मोकल, गुंजार पाटील, सचिन डाऊर, वैशाली भिडे, चंद्रकांत मुकादम, सूर्यकांत दोडेकर, नरेश मोकाशी, कृष्णा पाटील, संजय पाटील, राजेश चोगले, वरद गावंड, आर्यन मोरखडकर, संदेश राजगुरू या व्यक्तिमत्त्वांचा विशेष सन्मानमूर्ती देऊन गौरव करण्यात आला.

# कष्टकरी नगर येथे महिलांसाठी विविध कार्यक्रम

**रसायनी : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कष्टकरी नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांसाठी मनोरंजनाचे खेळ तसेच जागतिक महिला दिनाचे महत्त्व, आर्थिक बचत कसे करावे याबद्दलची माहिती देण्यात आली.

यावेळी युवा संस्थेच्या रेश्मा निलंगे मॅडम व विद्या रामगुडे मॅडम यांनी महिलांचे हक्क जबाबदारी आणि मनोरंजनात्मक खेळ याबद्दल महिलांना माहिती देऊन विशेष सहकार्य केले. आपणच आपल्या घरात मुलगी आणि मुलगा यांना समान वागणूक देतो का? असा प्रश्न केला आणि महिलांना कळले कि आपणही मुलगी आणि मुलगा हा भेदभाव करतो याची जाणीव झाली. त्यामुळे प्रत्येक




महिलांनी आपण स्वतः हा भेदभाव करणे थांबवले पाहिजे याची जाणीव करून दिली.

तसेच गुणा माळकर पोस्टल असिस्टंट शिळफाटा व सौ सुनीता चौधरी असिस्टंट पोस्ट मास्टर पनवेल व प्रेसिडेंट रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर यांनी आपले घर सांभाळत असताना यातून आपली स्वतः ची आर्थिक बचत कशी होईल आणि त्याचा भविष्यासाठी उपयोग व मुलांच्या शिक्षणासाठी कसा फायदा होईल याची माहिती देऊन पोस्ट ऑफिस च्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी आपले एक सामाजिक जबाबदारी व आपले कर्तव्य समजून आई फाऊंडेशन चे संस्थापक श्री राजे बाबुराव खैरे व सदस्य मनोज न्याहार यांच्या वतीने १८० किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप केले. त्यामुळे येथील महिलांमध्ये समाधान व्यक्त केले जात होते.

या कार्यक्रमाचे विशेष आयोजन सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड यांनी आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी उपसरपंच लीना मयूर ठाकूर, रेश्मा भूपेंद्र माळी – भाजप महिला अध्यक्ष महिला आघाडी वावेघर, मालती संतोष वाघमारे, रिया प्रदीप माळी, पूजा चंद्रकांत भोईर, स्नेहा स्वप्नेश गायकर, संगीता राठोड, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष प्रिया संदीप पाटील, बार्टी संस्थेच्या मनिषा कळके, सुरेखा खंडागळे, माजी उपसरपंच प्रतिभा कोणकर, माजी सरपंच रुक्मिणी गायकवाड, मा. सदस्य नंदाताई आटपाडकर व इतर महिला उपस्थितीत होते.

# नडोदे गावात अवैध भूसुरुंग

- शाळा आणि पाणीपुरवठा टाकीला धोका
- जीवसृष्टीसह पर्यावरणाची होतेय हानी
- ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार

**खालापूर : प्रतिनिधी**

नडोदे गावात बेकायदेशीर सुरुंग लावून डोंगराचे उत्खनन सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी रायगड, तहसीलदार खालापूर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करीत कारवाईची मागणी केली आहे.

मुंबई-पुणे महामार्गाच्या दिड किमी अंतरावरील निसर्गरम्य मौजे नडोदे गावात अलीकडच्या काळात येथे मोठ्या प्रमाणात जमीनविक्री व विकासकामे सुरू आहेत. मात्र, या विकासाच्या नावाखाली काही भू-माफियांनी डोंगराचे उत्खनन सुरू केले असल्याने पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

हा प्रकार केवळ एकदाच नव्हे, तर दररोज सुरू असल्याचा गंभीर आरोप नडोदे ग्रामस्थांनी केला आहे. गावाच्या हद्दीत दगड फोडण्यासाठी सुरुंग लावणे गंभीर गुन्हा असताना स्फोटांमुळे ध्वनी प्रदूषण, वायु प्रदूषण, भूकंपासारखे धक्के, जमिनीची हानी, नागरिकांच्या जीवितास धोका असे गंभीर परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सुरुंग लावण्यात येणाऱ्या ठिकाणापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर शाळा, पाण्याच्या टाक्या आणि निवासी वस्ती असल्याने विद्यार्थी , लहान मुले, महिला व वृद्ध नागरिक यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

नडोदे गावातील बेकायदेशीर सुरुंग प्रकरण हे केवळ पर्यावरणीय मुद्दा नसून नागरिकांच्या जीविताशी निगडित गंभीर समस्या बनली आहे. वेळेत कारवाई न झाल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.



### ▪ कठोर कारवाईची मागणी

*या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या तक्रारीची प्रत पोलीस अधीक्षक रायगड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक खालापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती खालापूर, ग्रामपंचायत नडोदे तसेच खाण अधिकारी रायगड यांना पाठविण्यात आली आहे.*

# खोपोली शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध -नगराध्यक्ष शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेची विशेष सभा नुकतीच नगरपरिषदेच्या सभागृहात झाली. या सभेत घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांची माहिती जनतेपर्यत पोहचविण्यासाठी नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयाची महिती देत खोपोली शहराच्या विकासासाठीचा अजेंडा घेवूनच सर्व नगरसेवक काम करीत असल्याचे सांगताना आम्ही खोपोलीच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे नगराध्यक्ष शेंडे यांनी सांगितले.

नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित पत्रकार परिदेला उपनगराध्यक्ष विक्रम साबळे उपस्थित होते. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी विशेष सभेतील झालेल्या प्रमुख निर्णयांची माहिती देताना सांगितले की, दिव्यांग बांधवांच्या पेन्शनमध्ये गेल्या पाच वर्षात कोणतेही वाढ झाली नव्हती, त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट येवू नये बासाठी पाचशे रुपयाची वाढ करण्यात आली.

खोपोली नगर परिषद क्षेत्रातील ज्या मालमत्ता नारकांना मालमत्ता शास्ती लागलेली आहे त्यांना मालमत्ता शास्तीमध्ये पन्नास



टक्के सूट देण्यास मान्यता देण्यात आली. ज्या मालमत्ताधारकांना मालमत्ता कर शासकीयमध्ये ५० टक्के जास्त माफी करता अर्ज प्राप्त झाले अशा १६१ अर्जधारकांना शास्तीमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त माफी देण्यास मान्यता देवून मंजुरीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवली आहे.प्रभाग क्रमांक १० मधील उमरजी पटेल नगर येथे श्रीराम मंदिरा शेजारी सामाजिक सभागृह कामाचे मंजुरी देण्यात आली. गगनगिरी महाराज आश्रमाकडे भाविकांची मोठी गर्दी होत असते रस्ता अरूंध असल्याने वाहतुककोंडी होते त्यामुळे विकास रस्ता विकास योजनेप्रमाणे १८ मीटर रुंदीचा करण्याची मंजुरी देण्यात आली. जुना मुंबई मुंबई-पुणे महामार्गावरील रस्ता दुभाजकावर आयआरबीने वृक्ष लागवड केली परंतु दुर्लक्ष होत असल्याने नगरपालिकेने हनुमान मंदिर ते गुडलक चौक रस्ता दुभाजकावर वृक्ष लागवड करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. सीएसआर फंडातून विविध शाळांवर सोलार सिस्टम बसविण्यात येणार आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी शिफारस केल्यानुसार जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपाययोजना साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत विविध कामांना मंजुरी देण्यात आली. रस्ता खोदकामाचे काम नगरपालिका नळकनेक्शन जोडताना नगरपालिकेच काम करेल याचा बोजा नागरीकांवर नसेल. महत्वपूर्ण अ निर्णय घेतला असल्याचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी सांगितले. विशेष सभेतील निर्णय मंजूर करण्यासाठी उपस्थित सर्व नगरसेवक नगरसेवकांनी पाठिंबा दिल्याबद्दल नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांनी आभार व्यक्त केले. मागील अर्थसंकल्पीय बैठकीत २३७ कोटी ५६ लाख ४२ हजार २७७ रुपये अर्थसंकल्प सादर करण्यात आला सर्वानुमती तो मंजूर करण्यात आला.

या सभेत घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी नगराध्यक्ष शेंडेयांनी ही पत्रकार परिषद आयोजित केली होती.

## इनरव्हील क्लब खोपोलीतर्फे ज्येष्ठ नागरिकांना डिजिटल मोबाईलचे प्रशिक्षण

**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब खोपोली तर्फे ज्येष्ठ नागरिक हॉल येथे सर्व सदस्यांना डिजिटल मोबाईलचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच मनोरंजनाचे कार्यक्रमसुद्धा घेण्यात आले.

ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा दीना शहा, सेक्रेटरी मधुमिता, व्हाइस प्रेसिडेंट राजश्री आणि आयपीपी जयश्री कलोशी यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. गणेश पूजनानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. क्लबच्या अध्यक्ष दिना शहा यांनी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रवींद्र घोडके आणि सेक्रेटरी नरेंद्र हर्डीकर यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन केले आणि आजच्या कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

आयपीपी जयश्री कलोशी यांच्या सुंदर गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्हाईस प्रेसिडेंट राजश्री यांनी मोबाईलच्या आवश्यक आणि रोजच्या कामात येणाऱ्या फिचर्सची माहिती उपस्थित सर्व ज्येष्ठ सदस्यांना दिली आणि सर्वजण ती पूर्ण प्रयत्नाने शिकण्याचा प्रयास करत होते, प्रश्न विचारत होते आणि हे शिकणे एन्जॉयही करत होते.

यानंतर मनोरंजनाचे गेम्स घेतले गेले ज्यामध्ये पासिंग रुमाल, हौजी हौजी आणि मध्ये सरप्राइज गेम्सही घेतले गेले. उपस्थित सर्व सदस्यांनी या पूर्ण कार्यक्रमाचा खूप आनंद घेतला आणि खुश झाले. सर्व गेम्ससाठी खूप सारे प्राइजेस दिले गेले. कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचे ५० मेंबर्स आणि इनरव्हीलचे १७ मेंबर्स उपस्थित होते.



## नागोठणे पत्रकार असोसिएशनचे कार्य उल्लेखनीय -खासदार तटकरे

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा १४वा वर्धापन दिन श्री जोगेश्वरी माता प्रांगणात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार सुनील तटकरे होते.

यावेळी खासदार तटकरे यांनी कै. तात्यासाहेब टके यांच्या प्रेरणेने नागोठणे पत्रकार असोसिएशन सातत्याने उत्कृष्ट कार्य करत आहे, असे गौरवोद्गार काढले. गेल्या १४ वर्षांपासून असोसिएशनने पत्रकार, मान्यवर व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून समाजात सकारात्मक कार्याला चालना दिली आहे.

आजच्या सोशल मीडियाच्या स्पर्धात्मक युगातही नागोठणे पत्रकार असोसिएशनच्या पत्रकारांनी आपली ओळख टिकवून ठेवली आहे, हे त्यांच्या जिद्दीचे द्योतक असल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार तटकरे यांनी नागोठणे शुद्ध पाणी



योजनेतील अडचणी दूर करून नागरिकांना लवकरच शुद्ध पाणी मिळवून देण्याचे सांगितले. तसेच शासनाकडे पाठपुरावा करून नागोठणे तालुका निर्मितीसाठी मान्यता मिळवून देण्याचे अभिवचन दिले.

असोसिएशनच्या वर्धापन दिनानिमित्त खालील पत्रकारांना यशवंत कांबळे (दापोली) - कै. तात्यासाहेब टके ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार, प्रशांत शेडगे (पनवेल) - उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार, परेश शिंदे (माणगाव) - युवा पत्रकार पुरस्कार देवून खासदार तटकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे यांच्या समवेत रजिप सदस्य सुमितदादा काते, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोरभाई जैन, नरेंद्रशेठ जैन, भाईसाहेब टके, रायगड जिल्हा दिशा समिती सदस्य शिवरामभाऊ शिंदे, नागोठणे सहकारी भातगिरणीचे सभापती सदानंद गायकर, मधुकर ठमके, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, सुधागड पंचायत समितीचे उपसभापती संदेश शेवाळे, प्रसिद्ध उद्योजक राजेश मपारा, सोपानभाऊ जांबेकर, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, राष्ट्रवादी काँग्रेस नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, माजी सरपंच विलास चौलकर, माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस सद्दाम दफेदार, नागोठणे उपसरपंच अकलाख पानसरे, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष शैलेश रावकर दिनेश घाग आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून तुकाराम खांडेकर गुरुजी, उद्धव सिताराम रावकर, भास्कर सोलेगावकर सर, मोहन नागोठणेकर,प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे, विकास खांडेकर, राम नाकती, तन्मय गणेश नेरपगार, सिमीन रमिज दफेदार, प्रेरणा निवास कदम, ओमकार भालचंद्र शिर्के, कुमारी अनुष्का विनोद भोईर, प्रशांत सारंग, तनिषा संतोष बैकर, कुमारी नेहा हिमांशु दोरे, अनिश किरण पालकर, अर्णव श्रीकांत रावकर यांचा खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक अध्यक्ष ॲड. महेश पवार यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राकेश तेलंगे यांनी केले. असोसिएशनचा वर्धापन दिन यशस्वी करण्यासाठी नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे मार्गदर्शक भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, खजिनदार किशोर कदम, सहसचिव राजेंद्र जोशी तसेच सदस्य विनोद भोईर, सुनिल कोकळे, दिनेश ठमके, चेतन टके, सचिन नेरपगार, राजेश पिंपळे, मंजुळा म्हात्रे, वर्षा सहस्त्रबुद्धे आदींनी परिश्रम घेतले.

## माणगावात स्वामींचा प्रकट दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ मठ, साईनगर पूर्व माणगाव येथे मोठ्या भक्ती भावाने स्वामींचा प्रकट दिन २० मार्च २०२६ रोजी साजरा करण्यात आला.

त्या दिवशी सकाळी स्वामींची पाद्यपूजा, सत्य दत्ताची पूजा, दुपारी बारा वाजता महाआरती, महाप्रसाद, नामस्मरण, महाआरती संध्याकाळी महाप्रसाद आणि सुरुवातच भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली, प्रकट दिनाच्या निमित्ताने संपूर्ण माणगाव



तालुक्यातील विविध ठिकाणाहून स्वामीभक्त भाविक आले होते. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव, स्वामी समर्थ उत्सव कमिटी माणगाव, आणि सर्व स्वामी भक्तांनी कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.

## उद्यम विकास प्रकल्पांतर्गत कायदासाथी प्रशिक्षण

**मोहोपाडा : प्रतिनिधा**

महिला आर्थिक विकास महामंडळ जि रायगड अंतर्गत प्रगती लोकसंचलीत साधन केंद्र व नवतेजस्विनी ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत कायदासाथी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

सूत्रसंचालन प्रगती सिएमआरसीच्या व्यवस्थापक पदमावती गायकवाड यांनी केले. मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष डॉ. हेमलता चिंबुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. मार्गदर्शक योगेंद्र यनम, तालुका विधी सेवा समिती, लिपिक कोर्ट, कर्जत, तसेच पॅनलवरील ॲड. भारती ढाकवळ, ॲड. मिला चव्हाण तसेच माविम रायगड चे एएमओ प्रसाद पिंपरकर, महिला व बाल सरंक्षण




अधिकारी प्रमोद वाघ यांनी महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन केले.

महिलांचे अधिकार, अन्याय विरोधी विविध कलम व त्याचा उपयोग कशा प्रकारे करावा हे क्लियर केले, हे ट्रेनिंग महिलांनी आत्मसात केले,या ट्रेनिगला प्रगती सिएमआरसी अध्यक्ष, डॉ.हेमलता चिंबुळकर सचिव सविता मोरे, सदस्य तुपे, गायकवाड ताई पुजा कालेकर आदी संचालक मंडळ उपस्थित होते. तसेच स्वयंसहाय्यता बचत गटातील ७० महिला उपस्थित होत्या. ट्रेनिंगसाठी माविम रायगडचे जिल्हा समन्वय अधिकारी विजय सर, सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी वंदना मॅडम, तसेच लेखाधिकारी योगिनी मॅडम, सिएमआरसी लेखापाल अंकीता बडेकर व सहयोगिनी, मंगलताई, मधुराताई, अश्विनीताई, सुमनताई आणि सिआरपी यांचे मोलाचे योगदान मिळाले.



**पेण : खासदार धैर्यशील पाटील यांना वाढदिवसानिमित्त कामगार नेते सुरेश पाटील, भाजप उपाध्यक्ष विशाल म्हात्रे, बीएमएस जिल्हा उपाध्यक्ष राजन घरत यांनी शुभेच्छा दिल्या.**

## खासदार धैर्यशील पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

भाजपचे दक्षिण जिल्हा अध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवस सोपान जांभेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व सचिन मोदी यांच्या संकल्पनेतून मोठ्या उत्साहामध्ये नागोठणे शहरांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून करण्यात आला. सर्वप्रथम भाजप शहर कार्यालय मोदी पार्क नागोठणे येथे प्रमुख कार्यकर्ते जमून खासदार साहेबांच्या वाढदिवसानिमित्त अभिनंदनचा ठराव केला व त्याला सर्वांनी मते मंजुरी देऊन खासदार धैर्यशील पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यानंतर सर्व कार्यकर्ते डॉक्टर कोकणे हॉस्पिटल येथे गेले तेथे विविध रुग्णांना फळवाटप केले तसेच नंतर विविध आदिवासी



वाडीवर जाऊन लहान मुलांना खाऊचे वाटप केले. कार्यक्रमाच्या वेळी सोपान जांभेकर, महामंत्री आनंद लाड, सचिन मोदी, मारुती देवरे, अनंत वाघ, मोहिते साहेब, सिराज पानसरे, गणेश घाग , शेखर गोळे, अंकुश सुटे, संज्योती लाड, अर्पणा सुटे, किशोर भाई म्हात्रे, विवेक रावकर, विठोबा माळी, प्रमोद नागोठणेकर, धनराज उमाळे ,तीरत पोलिसांनी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष गणेश घाग यांनी केले व भाजपचे कार्यकर्ते सचिन मोदी यांनी आपले मनोगत व्यक्त करून खासदार धैर्यशील दादा पाटील यांना दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पाली पोलिसांकडून रमजान ईदच्या शुभेच्छा

**सामाजिक सलोख्याचे दर्शन**

**पाली : प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याची सांगता आणि ईद-उल-फित्रनिमित्त शनिवारी (दि.२१) तालुक्यात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या आनंदाच्या क्षणी सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे दर्शन घडवत पाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी पाली येथील मशिदीत जाऊन मुस्लिम बांधवांची भेट घेतली व ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी पोलीस निरीक्षक शेरेकर यांनी पाली नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर यांना पुष्पगुच्छ देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मशिदीत उपस्थित असलेल्या इतर मुस्लिम



बांधवांनाही त्यांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. 'सण-उत्सव हे समाजाला जोडण्याचे काम करतात. अशा प्रसंगी एकमेकांच्या आनंदात सहभागी झाल्याने सामाजिक ऐक्य अधिक मजबूत होते', अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी शेरेकर यांच्यासोबत उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर तसेच पाली पोलीस ठाण्यातील इतर अधिकारी, कर्मचारी आणि मुस्लिम समुदायातील प्रतिष्ठित नागरिक व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांच्या सन्मानासोबतच आरोग्याची जाणीव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

समाजाच्या प्रगतीचा कणा असलेल्या महिलांच्या सन्मानासोबत त्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा एक स्तुत्य आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रम उत्साहात पार पडला. नागरी सामाजिक विकास संस्था, रायगड आणि खालापूर कलोते माधवबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान व आरोग्य जागरूकता कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता वानखेडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या, तर माधवबाग ओपीडी प्रमुख डॉ. श्रद्धा सातपुते यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. त्यांच्या



मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला ज्ञान, अनुभव आणि प्रेरणेची एक समृद्ध किनार लाभली.

कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी, आरोग्यविषयक मार्गदर्शन व प्रभावी व्याख्याने आयोजित करण्यात आली. याचबरोबर, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यात आला. हा उपक्रम म्हणजे केवळ कार्यक्रम नव्हे, तर महिलांच्या सशक्तीकरणाचा एक सामाजिक संकल्प ठरला.

या यशस्वी आयोजनामागे नागरी सामाजिक विकास संस्थेच्या संस्थापिका वर्षा मोरे यांचे विशेष योगदान राहिले. आपल्या मनोगतात त्यांनी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, अशा प्रकारचे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरतात, असे मत व्यक्त केले.

# आकाश दीप आयपीएलमधून बाहेर

## कोलकाता नाईट रायडर्सच्या अडचणीत वाढ

**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) समोरील वेगवान गोलंदाजीच्या समस्या संपण्याचे नाव घेत नाहीत. हर्षित राणा तसेच मथीशा पाथिराणा (ज्याला अद्याप श्रीलंकेच्या क्रिकेट बोर्डाकडून परवानगी मिळालेली नाही) यांच्यानंतर आता वेगवान गोलंदाज आकाश दीप पाठीच्या दुखण्यामुळे आयपीएल २०२६मधून बाहेर पडला आहे.

कोलकाता नाईट रायडर्सच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, दुर्दैवाने आकाश दीप या हंगामात खेळू शकणार नाही, तो आयपीएलमधून बाहेर पडला आहे. बंगालच्या या २९ वर्षीय गोलंदाजाला गेल्या वर्षी अबू धाबी येथे झालेल्या मिनी-लिलावात केकेआरने एक कोटी रुपयांच्या मूळ किमतीत खरेदी केले होते.१८ मार्चपासून कोलकाता येथे सुरू झालेल्या केकेआरच्या सराव शिबिरात आकाश अद्याप रूजू झालेला नाही. तो सध्या



बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसन प्रक्रियेतून जात आहे. त्याच्या दुखापतीचे नेमके स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र व्यवस्थापनाने याबद्दल फ्रँचायझीला कल्पना दिली आहे.

आकाशच्या अनुपस्थितीमुळे केकेआरला आता बदली खेळाडू शोधावा लागणार आहे. केकेआरचे मुख्य प्रशिक्षक अभिषेक नायर यांनी म्हटले की, येत्या एक-दोन दिवसांत आम्ही निर्णय घेऊ. हर्षित सध्या बीसीसीआयच्या देखरेखीखाली आहे. वैद्यकीय पथकाकडून अहवाल मिळाल्यावर आम्ही परिस्थितीचे मूल्यमापन करू आणि मुंबईला रवाना होण्यापूर्वी अधिकृत घोषणा करू.

हंगाम सुरू होण्यापूर्वीच केकेआरच्या गोलंदाजीची चिंता वाढली आहे. संघाने मथीशा पाथिराणा याच्यावर १८ कोटींची बोली लावली होती, पण त्याला अद्याप श्रीलंकेकडून एनओसी मिळालेली नाही. तो किमान सुरुवातीचे काही सामने मुकण्याची शक्यता आहे. सध्या केकेआरकडे वैभव अरोरा, उमरान मलिक आणि कार्तिक त्यागी हे भारतीय वेगवान गोलंदाज उपलब्ध आहेत तसेच संघ व्यवस्थापन अष्टपैलू कॅमेरून ग्रीनचा वापर काही षटकांसाठी करू शकते. केकेआरचा पहिला सामना २९ मार्च रोजी वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध होणार आहे.

### दुखापतींचा अडसर

आकाश दीपसाठी दुखापतींचे सत्र नवीन नाही. २०२२मध्ये आयपीएल पदार्पण केल्यापासून चार हंगामांत तो केवळ १४ सामने खेळू शकला. त्याने १० बळी घेतले आहेत. गेल्या वर्षी तो आठ कोटी रुपयांच्या मोठ्या रकमेसह लखनऊ सुपर जायंट्सचा भाग होता, मात्र एका हंगामानंतर त्याला संघातून मुक्त करण्यात आले होते.

# अंडर-१९ वर्ल्डकप विजेत्या संघाचा उपकर्णधार अभिज्ञान कुंडूचा सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

फेब्रुवारी २०२६मध्ये झिम्बावे आणि नामिबियात झालेल्या आयसीसी-१९ वर्षाखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताने विजेतेपद पटकाविले. या संघाचे उपकर्णधारपद भूषविणारे भारतीय संघातील यष्टिरक्षक-फलंदाज अभिज्ञान अभिषेक कुंडू याचा नवी मुंबई महापालिका सर्वसाधारण सभेत महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते सभागृहाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील, सभागृह नेते सागर नाईक, विरोधी पक्षनेते विजय चौगुले, क्रीडा समिती सभापती गिरीश म्हात्रे व उपसभापती राजू मढवी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी सभागृह नेते सागर नाईक यांनी मांडलेल्या अभिनंदनपर प्रस्तावास विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी अनुमोदन दिले. आयुक्त, उपमहापौर व महापौरांनीही अभिनंदनपर मनोगते व्यक्त केले. कोपरखैरणे येथे वास्तव्यास असलेला अभिज्ञान कुंडू याने १९ वर्षाखालील भारतीय क्रिकेट संघाचा उपकर्णधार तसेच उत्कृष्ट यष्टीरक्षक, फलंदाज म्हणून एकूण चार अर्धशतके करून मोलाचे योगदान दिले. अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्ध विजयश्री मिळवून विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करीत अभिज्ञानने संपूर्ण विश्वचषक मालिकेत २३९ धावा केल्या. संघातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून त्याची नोंद झाली आहे.

यापूर्वी सन २०२५मध्ये पार पडलेल्या आशिया कप स्पर्धेतही अभिज्ञानने जलद द्विशतकाचा विश्वविक्रम प्रस्थापित करीत नाबाद २०९ धावा आपल्या नावावर नोंदवल्या असून भारतीय संघाला अंतिम फेरीपर्यंत पोहचविण्यात त्याचे मोठे योगदान राहिले आहे.

भारतीय संघात उपकर्णधार म्हणून आपले स्थान भक्कम करणारा आणि नवी मुंबई शहराचे नाव देशात व जगात उज्ज्वल करणारा अभिज्ञान हा ठरला आहे. या उदयोन्मुख खेळाडूस नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महासभेत सन्मानित करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापौर यांच्या पदनामाने विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातून खेळांना व खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम सातत्याने केले जात आहे. अशाच प्रकारे शहरातील ४०+ वयोमान असलेल्या खेळाडूंनी शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त रहावे या हेतूने नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन २३ ते २५ मार्चदरम्यान करण्यात आले आहे.

या स्पर्धेत ४० वर्षावरील वयोगटाचे नवी मुंबईच्या ३० गावांतील ३३ संघ आणि शहरी विभागातील २५ संघ सहभागी होणार आहेत. सामने महापालिका मुख्यालयाजवळील मैदानावर खेळवले जातील. विजेत्या आणि उपविजेत्या संघास आकर्षक चषक तसेच वैयक्तिक उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेतील संघांना प्रोत्साहन देण्याकरिता नवी मुंबईतील क्रीडाप्रेमींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे सभापती गिरीश म्हात्रे यांनी केले आहे.


## पाकिस्तान सुपर लीग प्रेक्षकांविना रिकाम्या स्टेडियममध्ये होणार

**कराची** : इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका युद्धाचा फटका आता क्रीडा स्पर्धांवरही होताना दिसत आहे. काही दिवसांतच सुरू होणार असलेल्या पाकिस्तान सुपर लीगचे सामने प्रेक्षकांविना रिकाम्या स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहेत. यंदा सहा ठिकाणी सामने होणार होते, मात्र आता दोन किंवा एकाच ठिकाणी सामने आयोजित होण्याची शक्यता आहे. लाहोर किंवा कराची इथे सामने होतील, तर लाहोरमध्ये होणारा स्पर्धेचा उद्घाटन सोहळाही रद्द करण्यात आला आहे.

# मुंबईचा राजा रोहित शर्मा! | आयपीएलपूर्व कार्यक्रमात हिटमॅनच्या क्रेझची झलक

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने चाहत्यांसाठी एक खास कार्यक्रमांचे आयोजन केले होते. मुंबईचा प्री-सीझन 'द मिक्स' या कार्यक्रमाच्या पहिल्याच दिवशी मुंबई इंडियन्सच्या संपूर्ण संघाने उपस्थिती लावली. यादरम्यान संपूर्ण संघाला अचानक आलेले पाहून सर्वच चाहत्यांना सरप्राईज मिळाले, पण या दरम्यान रोहित शर्मासाठी चाहत्यांमध्ये असलेल्या क्रेझने सर्वांचे लक्ष वेधले.



मुंबई इंडियन्सने जिओ वर्ल्ड गार्डन मैदानावर एक दोन दिवसीय सोहळ्याचे आयोजन केले, जिथे एमआय डगआऊट तयार करण्यात आले. या कार्यक्रमात रॅपर डिव्हाईनचा परफॉर्मन्स सुरू असताना मुंबई इंडियन्सचा संपूर्ण संघ स्टेजवर पोहचला. यंदा संघाचा भाग असलेले सर्व खेळाडू रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव व हार्दिक पांड्यासह स्टेजवर होते. यानंतर सर्व खेळाडू खाली उतरले आणि हार्दिक पांड्या व सूर्यकुमार यादव या खेळाडूंना स्टेजवर थांबण्याची विनंती केली गेली. त्या दोघांसोबत रोहित नसलेला पाहून चाहत्यांनी एकच कल्ला केला.

रोहित शर्मा इतर संघाबरोबर खाली उतरला आणि चाहत्यांनी रोहित रोहित अशी नारेबाजी सुरू केली. कर्णधार हार्दिक पांड्याकडे माईक सोपवला असला तरी चाहत्यांनी मात्र रोहित शर्माच स्टेजवर हवा होता. रोहित मैदानावर येईपर्यंत चाहते थांबलेच नाहीत. त्यानंतर सूर्याने माईक घेतला आणि विचारले, काय बोलते पब्लिक? रोहित शर्मा त्यानंतर आवाज जोरात वाढला, पण रोहित काही स्टेजवर येईना. शेवटी सूर्यानेच सांगितले, आता तुम्हीच जोरात आवाज देऊन त्याला बोलवा. त्यानंतर मुंबईचा राजा रोहित शर्माचे चाहत्यांनी नारे दिले.

चाहत्यांचे भरभरून प्रेम आणि त्याची क्रेझ पाहता रोहित शर्मा अखेरीस स्टेजवर आला आणि त्याने सूर्या व हार्दिकची भेट घेतली. यानंतर सूर्याने रोहितला बोलण्याची विनंती केली, पण रोहितने सुरवातीला काही ऐकले नाही. मग शेवटी हिटमॅन राजी झाला आणि म्हणाला, मी टीमकडून सर्वांचे आभार मानतो. दरवर्षीप्रमाणे संघाला असाच सपोर्ट करा. आम्ही हाच प्रयत्न करू की यावर्षी सहा क्रमांकाची ट्रॉफी जिंकून तुम्हाला देऊ. थँक्यू सो मच, असे रोहितने म्हणत तिघेही खेळाडू एकत्र स्टेजवरून निघाले. रोहितसाठी चाहत्यांची क्रेझ पाहून हार्दिक-सूर्याही पाहतच राहिले. हा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

# कर्णधार इशान किशनला संघ सहकाऱ्याने दिली खुन्नस

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल हंगामाच्या पार्श्वभूमीवर संघाचा सराव सुरू झाला आहे. अशाच एक सराव सामन्यादरम्यान सनरायझर्स हैदराबादच्या खेळाडूने कर्णधार इशान किशनशी पंगा घेतला आहे.

उत्तम फॉर्मात असलेल्या इशानने अन्सारीच्या चार चेंडूत २० धावा चोपून काढल्या. पाचव्या चेंडूवरही इशानने मोठा फटका खेळला, मात्र या खेपेस चेंडू डीप स्क्वेअर लेगच्या क्षेत्ररक्षकाच्या हातात जाऊन विसावला. विकेटनंतर अन्सारीने कर्णधार इशानला उद्देशून शेरेबाजी केली आणि त्याला ड्रेसिंगरुमच्या दिशेने जाण्याचा इशाराही केला. इशानने हसत गमतीत हा प्रकार सोडून दिला. आपल्याच संघातील गोलंदाजाच्या या वागण्याने इशानही चकित झाल्याचे दिसून आले.



सनरायझर्स हैदराबाद संघव्यवस्थापनाने काही दिवसांपूर्वीच इशानची कर्णधार म्हणून नियुक्ती केली होती. नियमित कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीतून अद्यापही पूर्णपणे सावरलेला नाही. कमिन्स हंगामातील सुरुवातीचे काही सामने तरी खेळू शकणार नाही हे स्पष्ट झाल्यानंतर इशानची कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# पाकिस्तान क्रिकेटमधील वातावरण विखारी -गॅरी कर्स्टन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसीन नक्वी यांच्या नेतृत्वात काम करणे निव्वळ अशक्य आहे, अशा शब्दात पाकिस्तानचे माजी प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. पाकिस्तानचे प्रशिक्षक म्हणून कर्स्टन यांची नियुक्ती झाली होती, मात्र सहा महिन्यांत त्यांनी राजीनामा दिला होता.

एप्रिल २०२४मध्ये गॅरी कर्स्टन यांची पाकिस्तानचे वनडे आणि टी-२० प्रकाराचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा होता, मात्र असे असतानाही त्यांनी अवघ्या सहा महिन्यात



राजीनामा दिला. कर्स्टन यांनी राजीनाम्यासंदर्भात धक्कादायक गोष्टी सांगितल्या.

कर्स्टन यांनी टॉकस्पोर्ट्सशी बोलताना सांगितले की, पाकिस्तान क्रिकेटमधील वातावरण विखारी आहे. प्रत्येक कामात हस्तक्षेप केला जातो. व्यावसायिकतेचा अगदीच अभाव आहे. मोहसीन नक्वी यांच्या नेतृत्वात काम करणे आणि संघाला जिंकून देणे जवळपास अशक्य होते.

ते पुढे म्हणाले, कोचिंग स्टाफला बळीचा बकरा बनवला जात असे. खेळाडूंची मोट बांधून त्यांना जिंकण्यासाठी मार्गदर्शन करणे हे माझे आणि सहकाऱ्यांचे काम होते, मात्र बाहेर एवढी सुंदोपसुंदी सुरू असताना काम करणे निव्वळ अशक्य होते. खराब कामगिरी झाल्यावर खेळाडूंवर दंडात्मक कारवाई केली जात असे. असेच करायचे असेल तर प्रशिक्षकाची गरजच काय? असा सवालही त्यांनी केला आहे.

# चेन्नईच्या संघात यंदा काय असेल धोनीची भूमिका?

## संजूच्या आगमनाने बदलले समीकरण

**चेन्नई : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाचे बिगुल वाजण्यासाठी आता केवळ आठवडा उरला आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये क्रिकेटप्रेमींचे अनेक युवा आणि उदयोन्मुख खेळाडूंसोबतच चेन्नई सुपरकिंग्सचा ज्येष्ठ फलंदाज महेंद्रसिंह धोनीकडेही विशेष लक्ष असणार आहे. तो यंदा कोणत्या भूमिकेत दिसणार आहे याबाबतही धोनी आणि चेन्नईच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता दिसून येत आहे.

चेन्नई सुपरकिंग्सचा संघ ३० मार्च रोजी राजस्थान रॉयल्सविरुद्ध होणाऱ्या सलामीच्या लढतीमधून स्पर्धेतील आपल्या अभियानाची सुरुवात करणार आहे. वयाच्या ४४व्या वर्षी पुन्हा एकदा आपले कौशल्य दाखवण्यासाठी सज्ज झालेल्या धोनीसाठी यंदाचा



हंगाम आयपीएलमधील शेवटचा हंगाम ठरू शकतो, असा अंदाज क्रिकेट समीक्षकांकडून वर्तवला जात आहे. धोनीने चेन्नईच्या संघाकडून खेळत राहावे, असे त्याच्या चाहत्यांना वाटू शकते, मात्र संजू सॅमसन याचे आता चेन्नई संघात आगमन झाले आहे.

सॅमसन हासुद्धा यष्टीरक्षक आहे. एवढेच नाही तर उर्विल पटेलच्या रूपात चेन्नईकडे तिसऱ्या यष्टीरक्षकाचा पर्यायही आहे. अशा परिस्थिती महेंद्रसिंह धोनीला संघात स्थान मिळणार का? तसेच संघात स्थान मिळाल्यास तो कोणत्या क्रमांकावर फलंदाजी करणार? यंदा धोनी इम्पॅक्ट प्लेयर म्हणून खेळणार का? की एक सामान्य खेळाडू म्हणून खेळणार, धोनीला संघात घ्यायचं असल्यास चेन्नईचा संघ कसा असेल, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

लक्ष देण्यासारखी बाब म्हणजे आयपीएलमध्ये चेन्नई सुपरकिंग्सचा संघ हा त्याच्या चाहत्यांमुळे खूप लोकप्रिय आहे तसेच चेन्नईचे चाहते अधिक असण्यामागे ब्रँड धोनी हे एक कारण आहे. जेव्हा धोनी मैदानावर खेळण्यासाठी येतो तेव्हा चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहचतो हे दिसून आलेले आहेत.

गेल्या काही हंगामांमध्ये धोनीने वरच्या फळीत फलंदाजी केलेली नाही, मात्र तो जेवढ्या वेळेसाठी फलंदाजीसाठी आला, तेवढ्या वेळी सामन्याचे थेट प्रक्षेपण पाहणाऱ्या प्रेक्षकांची संख्या वधारलेली दिसून आल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे आया यंदाच्या आयपीएलमध्ये धोनी काय निर्णय घेणार याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता असेल.

# युवा खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या उत्तराने पिकला हशा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या रणधुमाळीला सुरुवात होण्यापूर्वीच सर्वांच्या नजरा एका युवा फलंदाजावर खिळल्या आहेत, तो म्हणजे वैभव सूर्यवंशी. गेल्या काही महिन्यांतील त्याच्या स्पोटक कामगिरीमुळे यंदाच्या आयपीएलमध्ये तो चौफेर फटकेबाजी करेल, अशी क्रीडाप्रेमींना खात्री आहे.

१९ वर्षांखालील विश्वचषक २०२६च्या अंतिम सामन्यात वैभवने १७५ धावांची ऐतिहासिक खेळी केली होती. भारताला विश्वविजेतेपद मिळवून देण्यात त्याचा मोलाचा वाटा होता. आता आपल्या



पहिल्याच आयपीएल हंगामासाठी वैभव सज्ज झाला असून राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यात तो दिसेल. राजस्थानचा पहिला सामना ३० मार्च रोजी गुवाहाटी येथे चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध होणार आहे.

मैदानावर दिग्गज गोलंदाजांची धुलाई करणाऱ्या वैभवने आता मैदानाबाहेरही प्रेक्षकांची मने जिंकण्यास सुरुवात केली आहे. सुरुवातीला माध्यमांसमोर लाजाळू वाटणारा हा खेळाडू आता अधिक आत्मविश्वासाने वावरताना दिसत आहे. नुकत्याच राजस्थान रॉयल्सच्या एका कार्यक्रमात त्याने आपल्या मिश्किल उत्तराने उपस्थितांना खळखळून हसवले.

वैभवला जेव्हा २०२६ च्या आयपीएलमधील त्याच्या वैयक्तिक लक्ष्याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्याने अत्यंत विनोदी शैलीत उत्तर दिले. आयपीएल २०२६साठी तुझे काय प्लॅन्स आहेत? तुला किती धावा करायच्या आहेत, तुझे लक्ष्य काय आहे?, असा प्रश्न एका पत्रकाराने विचारल्यार वैभवने मी दोन-तीन हजार धावा म्हणेन, असे उत्तर दिले. वैभवच्या या उत्तरावर सभागृहात एकच हशा पिकला. यानंतर वैभवने गंभीर होत पुढे सांगितले की, मी किती धावा करेन हे आधीच ठरवू शकत नाही. मी फक्त प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करत आहे आणि मला संघाला ट्रॉफी जिंकून द्यायची आहे. माझे कोणतेही वैयक्तिक ध्येय नाही, फक्त सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न असेल.

# पहिल्या सामन्यासाठी अश्विनने निवडला आरसीबीचा संघ

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धेतील पहिला सामना २८ मार्चला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये खेळवला जाणार आहे. दरम्यान, ही स्पर्धा सुरू होण्याआधी भारताचा माजी क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनने आरसीबीची मजबूत प्लेईंग ११ निवडली आहे, पण सात



कोटी खर्च करून संघात स्थान दिलेल्या वेंकटेश अय्यरला त्याने संघाबाहेर ठेवले आहे.

अश्विनने निवडलेल्या प्लेईंग ११मध्ये अय्यरला संघात स्थान देण्यात आलेले नाही. त्याला संघाबाहेर करून अश्विनने जेकब बेथेलला प्लेईंग ११मध्ये स्थान दिले आहे. याशिवाय विराट कोहली, फिल सॉल्ट, जेकब बेथेल, रजत पाटीदार, जितेश शर्मा, टीम डेव्हिड, रोमारियो शेफर्ड, क्रृणाल पांड्या, भूवनेश्वर कुमार, मंगेश यादव, यश दयाल आणि सुयश शर्मा यांचा समावेश आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com